# युगंधरा

(निसर्गपर काव्यसंग्रह – भाग ६)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**युगंधरा** (निसर्गपर काव्यसंग्रह - भाग ६)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : चैत्र कृ. पंचमी, शके १९४६
सोमवार, दि. २९ एप्रिल, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-972636-9-9

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

**सर्व रसिकवरांना**
**सादर समर्पण...**

# मनोगत

कधी कधी निसर्ग अगदी शांत असतो, पण त्या शांततेतही तो बोलत असतो...

वाऱ्याच्या स्पर्शात, पानांच्या कुजबुजण्यात, पावसाच्या टपटपीत आणि संध्याकाळच्या तांबड्या उजेडात.

मी लहानपणापासून या आवाजांकडे कान देत आले आहे. त्यात शब्द नव्हते, पण अर्थ होता. त्यात संगीत नव्हतं, पण लय होती आणि त्या लयीनेच मला या कवितांकडे नेलं.

या 'युगंधरा'कडे निसर्गाशी संवाद हा माझ्या लेखनाचा मूलाधार आहे. मी जेव्हा पेन हातात घेते, तेव्हा शब्द येत नाहीत. येतात दृश्यं, सुगंध, झुळका आणि आकाशाचे रंग. ते शब्दांत उतरवताना मी फक्त माध्यम असते; बोलतो तो निसर्ग स्वतः.

'युगंधरा' या संग्रहातील प्रत्येक कविता ही अशा एका संवादाची नोंद आहे. कधी नदी माझ्याशी बोलते, कधी पाऊस काही सांगतो, कधी मातीचा वास आठवण बनतो, तर कधी झाडाची सावली जपणूक करते. माझ्या लेखणीतून उमटलेले हे सारे स्पर्श म्हणजे निसर्गाने माझ्या अंतःकरणात ठेवल्या आठवणींची अक्षरं आहेत.

माझ्या कविता ऋतूंप्रमाणे बदलतात. वसंतात त्या हलक्या, उत्साही असतात; श्रावणात ओलसर आणि आत्मीय; शरदात त्या आकाशाच्या विशालतेकडे पाहतात आणि हिवाळ्यात त्या अंतर्मुख होतात. या ऋतूंमधून चालताना मला जाणवत गेलं की निसर्ग केवळ दृश्य नाही... तो आपल्यामध्ये घडणारा अनुभव आहे. पानगळ म्हणजे फक्त झाडांचं ओझं हलकं करणं नाही, तर माणसाच्या मनातही काहीतरी गळून पडणं आहे. नवा पाऊस म्हणजे नव्या सुरुवातीची चाहूल आहे. या जाणिवांनी माझ्या प्रत्येक कवितेला नवं रूप दिलं. मी निसर्गात जे पाहिलं, ते शब्दांत आणण्याचा प्रयत्न नाही केला, तर जे अनुभवलं, ते शब्दांत उतरवलं.

'युगंधरा' लिहिताना अनेकदा मला असं वाटलं की मी लिहीत नाहीये. मी फक्त निसर्गाने सांगितलेलं ऐकते आहे. वारा एखाद्या ओळीची लय सांगतो, धारा तिचं ठिपकं देऊन शब्द बनवते आणि झाडांची सावली विरामचिन्ह घालते. या कवितांचा स्पर्श म्हणजे फक्त भावनांचा ओघ नाही, तर त्या भावनांच्या मागे असलेली निसर्गाशी एकरूपता आहे. मी पानं, वारा, ढग, पाऊस, ओल, धूळ या सर्वांमध्ये एक माणूस म्हणून स्वतःला ओळखते.

त्या ओळखीतूनच या ओळी जन्म घेतात. या कवितांचं लेखन पूर्ण झाल्यावर, माझ्या अंतर्मनात एक वेगळी इच्छा डोकावली. या कवितांना ऐकवावं असं वाटलं. शब्दांना उच्चाराचं आयुष्य मिळालं तर ते नव्यानं फुलतात, त्यात स्वरांचा श्वास शिरतो. असं म्हणता म्हणता जन्म झाला 'सर्ग निसर्ग' या ऑडिओबुकचा.

या कवितांना माझ्या स्वतःच्या आवाजात सादर करताना, मी पुन्हा निसर्गाकडे परतले. प्रत्येक कविता वाचताना मला असं वाटलं मी पुन्हा त्या क्षणी आहे, ज्या क्षणी ती ओळ जन्मली होती. कधी पावसाचा आवाज पार्श्वभूमीत मिसळला, कधी झाडांच्या पानांची सळसळ माझ्या आवाजाला साथ देत गेली आणि त्या क्षणी शब्द केवळ शब्द राहिले नाहीत. ते अनुभवांचे स्वर बनले.

श्रोत्यांनी या ऑडिओबुकला दिलेला प्रतिसाद माझ्यासाठी आशीर्वादासारखा आहे. जेव्हा कोणी सांगतं, 'तुमच्या आवाजात निसर्ग ऐकू येतो', तेव्हा मला वाटतं, माझं लेखन आपलं ध्येय साध्य करतंय.

'युगंधरा' म्हणजे केवळ कवितांचा संग्रह नाही. तो माझ्या जीवनाचा निसर्गाशी झालेला संवादप्रवास आहे. या कवितांमध्ये माझ्या मनातील ऋतुचक्र आहे. स्मृतींचे ढग आहेत आणि वर्तमानाचा उजेडही आहे. कधी या कवितांमध्ये मी मुलगी आहे, कधी आई, कधी श्रोता, कधी सृष्टीचा एक कण. प्रत्येक भूमिकेत मी निसर्गाशी जोडलेली आहे. मला जाणवतं आपण सगळेच निसर्गाच्या एका सतत चालणाऱ्या कवितेचा भाग आहोत.

फरक एवढाच की काहीजण ती वाचतात, काहीजण ती जगतात. जेव्हा मी या कविता रसिकांसमोर ठेवते, तेव्हा त्या माझ्या राहात नाहीत. त्या वाचकांच्या आणि श्रोत्यांच्या भावना बनतात. कोणी त्या वाचताना आपल्या बालपणाचा पाऊस शोधतो, कोणी हरवलेलं उन्हं पुन्हा अनुभवतो, कोणी फक्त त्या ओळींतून शांततेचा क्षण घेतो. यामुळे माझ्या लेखनाचा हेतू पूर्ण होतो. निसर्गाशी झालेला

संवाद आता माझ्या माध्यमातून इतरांच्या मनात पोहोचतो आणि मग मला वाटतं 'युगंधरा' म्हणजे एका आत्म्याची दुसऱ्या आत्म्याशी झालेली ओळख आहे.

'युगंधरा' संपली नाही. ती रोज नव्यानं उमलते, नव्यानं वाहते. कारण निसर्ग कधी संपत नाही आणि त्याचं गाणं थांबत नाही. या कवितांमधून मी जे बोलले आहे, ते माझं नव्हतं. ते सृष्टीचं होतं. मी फक्त त्या स्वरांचा दुवा आहे आणि हा दुवा जोवर जपला जाईल, तोवर माणूस आणि निसर्ग यांच्यातील बंध अधिक घट्ट होईल.

'युगंधरा'चा हा प्रवास पुढेही सुरू राहील. कधी नव्या कवितांमध्ये, कधी नव्या आवाजात, कधी नव्या पिढ्यांच्या श्वासात. 'युगंधरा'च्या पानांवर हात ठेवताना मला जाणवतं, मी एका झाडाखाली बसून बोलते आहे, माझ्याभोवती वारा वाहतो आहे आणि त्या वाऱ्याच्या प्रत्येक झुळकीत माझ्या कवितेचा एक शब्द उडतो आहे.

तो शब्द कुठं जाईल, कोणाच्या मनात बसेल, मला ठाऊक नाही. पण एवढं नक्की, तो शब्द माझा नसून निसर्गाचा आहे. याच श्रद्धेने मी हा संग्रह तुमच्यासमोर ठेवते. वाचक, श्रोते, रसिक या सगळ्या निसर्गप्रेमींना समर्पित.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

'कविता म्हणजे निसर्गाचं हृदय ऐकण्याची कला.' कवीने जेव्हा आपल्या डोळ्यांतून निसर्ग पाहिला, तेव्हा फक्त झाडं, आकाश आणि नदी दिसली नाही तर त्या सर्वांमधून जीवनाची गती, काळाचा श्वास आणि अस्तित्वाचा गूढ अर्थ उमटला.

याच भावविश्वातून डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा नवीन कवितासंग्रह 'युगंधरा' जन्म घेतो. 'युगंधरा' हा शब्दच किती गूढ आहे. युगांचा सुगंध, काळाचा स्पर्श, पृथ्वीचा गंध. 'युग' म्हणजे काळाचा प्रवाह आणि 'धरा' म्हणजे भूमी. या दोघांच्या संगमातून जे काही उगवतं, ते म्हणजे 'युगंधरा', निसर्गाचं आणि मानवाचं अखंड नातं.

'युगंधरा'मधील प्रत्येक कविता ही निसर्गाच्या विविध रूपांची भावसंपन्न अभिव्यक्ती आहे. पण हा निसर्ग केवळ दृश्य नाही; तो जाणिवेचा, चिंतनाचा आणि आत्मसंवादाचा निसर्ग आहे. इथलं आकाश फक्त निळं नाही, तो स्वप्नांचा झरा आहे. धरती फक्त माती नाही, ती स्मृतींचं घर आहे आणि पाऊस म्हणजे केवळ थेंब नव्हे तर काळाचं अश्रू आहे.

या कवितांतून निसर्गाशी मानवी नातं पुन्हा जिवंत होतं. ते नातं ज्या युगात विस्मरणात गेलं आहे, त्या युगात ही कवयित्री पुन्हा ते नातं सांभाळते, सावरते, आणि नव्याने साकारते.

'युगंधरा'मधील निसर्ग स्त्रीसदृश आहे. ज्यात सृजन, वात्सल्य, वेदना आणि क्षमा या सगळ्या भावनांचा संगम आहे. कवयित्री कधी झाडासारखी शांत उभी असते, कधी नदीसारखी वाहते, कधी वादळासारखी राग व्यक्त करते, तर कधी पहाटेसारखी नव्याने उजळते.

हा निसर्ग म्हणजे तिच्या अंतर्मनाचं प्रतिरूप आहे. ती निसर्गाकडे पाहते तेव्हा खरं तर स्वतःकडेच पाहते आणि म्हणूनच या कवितांमध्ये निसर्गाबरोबर आत्मचिंतनही आहे. 'युगंधरा' या शीर्षकातच काळ आणि क्षण यांचा संवाद दडलेला आहे. काळ हा अनंत आहे, पण कविता ही क्षणाची अमरता आहे. कवयित्रीने प्रत्येक कवितेत वेळेला थांबवले आहे. कधी पावसाच्या एका थेंबात, कधी आभाळाच्या एका झुळुकीत, कधी वाळवंटाच्या शांततेत. त्या क्षणांचे चित्रण करताना तिची लेखणी अतिशय सूक्ष्म होते. ती निसर्गातील लहानशा हालचालीतही अर्थ शोधते. पानांच्या सळसळीत, पाखरांच्या उडीत किंवा एका किरणाच्या वाकण्यातही.

या कवितांचा खरा गाभा म्हणजे आत्मसंवाद. कवयित्री निसर्गाशी बोलते, पण त्या बोलण्यातून ती स्वतःला समजून घेते. ती विचारते, 'मी कोण? ही पृथ्वी माझ्यात आहे की मी पृथ्वीमध्ये?' आणि त्या प्रश्नांचं उत्तर तिला निसर्ग देतो. वाऱ्याच्या स्पर्शात, पावसाच्या नादात, किंवा फुलांच्या हसण्यातून.

या कवितांमध्ये देवत्वाचं किंवा अध्यात्माचं स्वरूप आढळतं, पण ते उपदेशात्मक नाही. ते निसर्गाच्या स्पंदनातून आलेलं सहज तत्त्वज्ञान आहे. 'युगंधरा'च्या कवितांमध्ये भाषा अतिशय पारदर्शक आहे. ती ओघवती, सौम्य पण गूढ अर्थवाही आहे. वाक्यरचना साधी असली तरी तिच्या शब्दांमध्ये भावविश्वाची गहिरी खोली आहे.

कधी एकच शब्द कवितेचा अर्थ बदलतो. उदा. 'मातीचा श्वास', 'पानातलं हृदय', 'आभाळाचं अश्रू' हे शब्द तिच्या लेखणीतील जादू आहेत. काव्यरचनेत ठिकठिकाणी लय, नाद आणि प्रतीकात्मकता आहे. ती निसर्गाचं वर्णन करत नाही. ती त्याचं आवाहन करते.

या संग्रहाचा सर्वांत मोठा संदेश म्हणजे समरसतेचं तत्त्व. कवयित्री माणूस आणि निसर्ग या दोन टोकांना जोडते. ती सांगते, 'निसर्गाशिवाय मानव अपूर्ण आहे आणि मानवाशिवाय निसर्गाचं सौंदर्य निःशब्द आहे.'

या कवितांमधून पर्यावरणाच्या जाणिवा, माणसाच्या असंवेदनशीलतेवर भाष्य आणि निसर्गसंवर्धनाचा सूचक स्वरही उमटतो. पण तो कुठेही घोषणात्मक नाही. तो भावनात्मक आहे, अंतःकरणातून आलेला आहे.

'युगंधरा' हे नावच सूचित करतं की हा संग्रह काळाच्या ओलाव्याचा सुगंध

बाळगतो. युगानुयुगे जे सत्य आहे. निसर्ग, जीवन, सृजन ते इथं शब्दरूप झालं आहे.

या कविता वाचताना वाचकाला जाणवतं की निसर्ग हा केवळ पार्श्वभूमी नाही, तो आपल्या अस्तित्वाचाच आरसा आहे. 'युगंधरा' म्हणजे पृथ्वीचा सुगंध आणि माणसाचा श्वास. त्यांचा एकत्र श्वास म्हणजेच कविता.

या कवितासंग्रहातून डॉ. मंजूषा कुलकर्णी यांनी निसर्गाशी एक अंतर्मनाचा संवाद साधला आहे. त्या संवादात केवळ सौंदर्य नाही, तर जबाबदारीही आहे. निसर्गाशी जपलेलं नातं, त्याचं संवर्धन आणि त्याच्या माध्यमातून स्वतःचं परिष्करण.

'युगंधरा' वाचताना वाचकाला एक शांत, सुगंधी अनुभव येतो. जणू पावसाच्या पहिल्या सरीसारखा. ही कविता केवळ वाचायची नाही, ती अनुभवायची आहे.

'युगंधरा' म्हणजे काळाचा स्पर्श असलेली माती आणि त्या मातीतून उगवलेलं कवयित्रीचं शब्दफुल.

**श्री. सागर खेर्डेकर**
छत्रपती संभाजीनगर

# अनुक्रमणिका



१) दव पानावरचे
२) जगण्याची उर्मी
३) मौनाचे पहाड
४) धुक्याची चादर
५) ऋतुंचे चक्र
६) होऊन धबधबा
७) कोंब पाषाणातला
८) आभाळ भरू येई
९) एक डोंगर उभा की
१०) एक रम्य ही पहाट
११) तेजोगोलक सूर्य देखणा
१२) उंच उंच वनराजी हिरवी
१३) आला रे आला रे पाऊस
१४) चहाचे मळे
१५) मधुराणी सकाळ
१६) आला पाऊस भरात
१७) भकास वास्तु अंकुरलेली
१८) झरोका झरोका
१९) सुरम्य रस्ता
२०) प्रसन्न सकाळ
२१) इंद्रधनु शेतात उतरले
२२) दिवस उजाडतो चैतन्याने
२३) एकट्याने चालणे
२४) निशा उषेचा खेळ रंगला
२५) दुर्दम्य इच्छा
२६) मोती शिंपल्यातला
२७) स्वप्न डोंगराचे
२८) पावसाचं लग्न
२९) वेडा पाऊस
३०) दुतर्फा झाडांची दाटी
३१) वसा कोणता पुण्याचा
३२) माझं झोपडं सुरेख
३३) काळं निळं आभाळ
३४) झुडूप काटेरी
३५) संथ वाहताना
३६) पर्ण सुंदऱ्या
३७) येता पावसाची सर
३८) हिरव्या हिरव्या
गवत पात्या
३९) आठवणींचा पिंपळ
४०) झुंजुमुंजु पहाटंला
४१) शुभ्र श्वेत रंग
४२) प्रचंड लाटा हुंकारणाऱ्या
४३) जरी असलो मी काटेरी
४४) पाठलाग सूर्याचा
४५) सुंदर मोहक धबधबा
४६) नकोसा पाऊस
४७) सोनसकाळ
४८) गवताची सुगी
४९) डोंगरावरची जत्रा

# (१) दव पानावरचे

सृष्टीत अगणित सौदर्यस्थळे असतात. वेगवेगळ्या ऋतूत ती वेगवेगळी आढळून येतात. सृष्टी अनेक रत्नांनाही जन्माला घालते. त्यात मोती हे देखील देखणं रत्न खरे मोती शोधण्याच्या नादात पानापानांवरती टपोरे, हसरे दवबिंदूंचे मोती कधी कधी आपण दुर्लक्षीत करतो. हे दवांचे मोती जसे नजरेला सुखावनारे असतात ना तसेच ते मनाला खुलवणारे ही असतात. दवात प्रत्येकाच्या भीन्न भावना सजून बसलेल्या असतात. पानापानावर डवरुन सावरून बसलेले हे दवांचे मोती स्मृतीच्या मंजूशेत कशे चिरकाळ जपून ठेवले जातात नाही. अनमोल असे हे दवांचे मोती कोणाला कसे भासतात हे कवी मनाने टीपले जाते, अन् काव्य दवांचे मोती कवी सर्वांच्या हृदय पर्णावर सुशोभीत करीत जातात. गुंफत जातात, गुणगुणत जातात...

दव पानावरचे, हसू गालावरचे
थेंब मोतीया आनंदाचे
थेंब ऊजळतो रंग पानाचा
रंग पान देई थेंबा
एकरंगी प्रतिबींब पाहता
परस्परांना तनि शिरवा
तरारुन दव तरारते पन
पाना मिळते आंदन दान
शिशीरातल्या गळती पूर्वी
मौक्तीक सालंकृत कन्यादान
दव टपोर भाव विभोर
माया माहेराची शिदोरी फुलवन्याची
दव रोमांच साजन स्पर्शी
रती राणीचे लज्जा भाव
दव गर्भातील जिव बुडबुडा
प्राणांचा हा कोश लहान
दव चिमकुल्या बाळ ओठीचा

लाडीक पापा हळूच टिपा
दव रमनिच्या गालावरती
टपटपनारे मोती टपोरे
दव वृद्ध पणे आसूसले पण
स्मृती बिंदू आधारखनी
ऐक दवा रे थांबून जाना
हृदय पाकळी घे विश्राम
कधी न मिटशील तेथून राजा
स्मृती राऊळीचे परमधाम
दवात दर्शन श्रीरामाचे
एक सोहळा अति अभिराम



# (२)
## जगण्याची उर्मी

जीवन जगताना सगळं अचानक खूडून जाण्याची, संपण्याची, थांबण्याची, थबकळ्याची, थीजण्याची अशी वेळ कधीतरी येते अन् होत्याचे सारे नव्हते असे होऊन जाते. मन सुन्न होते. चित्त खिन्न होते अन् अंत:करण कोलमडून पडते. जगण्याची आशाच संपून जाते. माणूस सार सारं संपल म्हणून हतबल होतो. त्याच्या शरीरातील रोम रोमात निराशा भरुन जाते. पण अस सारं केवल माणसाच्याच बाबतीत घडतं का हो? सृष्टीत, निसर्गातही अस घडत असेल का कुठे? हो घडतच की तिथेही. इवल्याश्या बीजाचा मोठा वृक्ष बहरुन येतो पण अचानक कोणीतरी कुऱ्हाड चालवतो, मोठा वृक्ष तुटून पडतो. राहत ते त्याच बोडखं झालेल खोड पण हे खोडच निराशेत नाही बुडत. उलट आशेचा अंकुर फोडून झाडाला पुन्हा उभं करतं. सांगत जातं आपल्यातली ही जगण्याची उर्मी. ही अशीच हिरवी राखली पाहिजे नाही.

खुडल्या फांदीच्या खोडावर
रोप चिमुकले झाडाचे
जगण्याची ही उर्मी अशी की
कौतुक वारस खोडाचे
कुणी चालवी कऱ्हाड जेव्हा
झाड बहरले कोसळते
डोळ्या देखत स्वमरनाने
ध्येय तयाचे ढासळते
किती वर्षांची घोर तपस्या
कोंबालाते झाड बनवते
ऊन वारा पाऊस झेलत
सोशीकतेने त्याला तगविते
बहरु येण्या आयुष्य जाते
छाटण्यास क्षण एक पुरेसा
कृतघ्नतेने वार झाले तरी
सोडत नाही जीवन आशा

झाड संपुनी खोड राहते
चैतन्याची धार वाहते
एक कोंब हलुवार डोकवे
झाड बालपन पुन्हा पाहते
फुटता अंकुर झाडाला बळ
सोशिकतेचे मिळते ते फळ
नव्या रुपाला जन्मा घालून
खोड जनक हा होई सफळ
सारे संपले असे वाटता
अंतरातला कोंब जागवा
स्नेह धारेने रस पोसवूनी
पुर्नजन्म हा इथे जगावा
जगण्याची ही उर्मी अशी की
मरणाला ही थारा नाही
जीवन अमुल्य बनवू असे की
झाडाकडून शिकूया काही

## (३)
## मौनाचे पहाड

एखादी व्यक्ती अतीशय शांत, गप्प गप्प, अबोल अशी दिसत असते. तीच्या मौनाचे अनेक जन अनेक अर्थ काढत असतात. परंतू खरच मौन हा तीचा मूळ स्वभाव असतो का हो. याचा शोध जर घेतला तर चैतन्यान सळसळणारी ती व्यक्ती आलेल्या असंख्य, अकल्पीत प्रसगांणी, संकंटांनी, आलेल्या कटू अनुभवांनी एकदम बडबडी असतानाही शांत होऊन जाते. मुळ स्वभावा विरुद्ध तिचा अगदी वेगळाच स्वभाव होऊन जातो. पृथ्वाच्या गर्भात उसळणाऱ्या तप्त लाव्हारसाला तिच्या उदरा बाहेर फेकले जाते. अन् बाह्य संकंटाचे सुसाट वारे त्या रसाला अगदी थंड करुन टाकतात ना तसेच ही माणसेही हा मौनाच्या पहाडासारखीच उभी असतात जणू.

मौनाचे पहाड उभे
      किती सोसले चटके
लाव्हारस उसळता
      अंग लाही लाही झाले
गर्भातून फेकताना
      अनोळखी जगतात
काय कोणासी बोलावे
      कोन मला जानतात
सैरावैरा जीव धावती
      उश्मा असह्य अति दाहक
पृथ्वीच्या उदरातून बाहेर
      तप्त लोंधे अति वाहक
युगे किती उलटून जाती
      मग प्रस्तर होती थंड
खडकांचा डोंगर होतो
      अभेद्य आणि अखंड

मुळ सोडून प्रकृती
      संकटानी झालो शांत
किती वेदना झेलून
      बसलो वनी निवांत
आज अबोल नि:शब्द
      अनुभवाचे भांडार
मी बोलतच नाही
      दुश: न देई हा संसार
मौनाचे तप मोठे
      आत झाकता कळते
वास्तवाची जान होता
      प्रौढी सारीच गळते
होत मौनाचे पहाड
      शिखरांनी नभी जावे
वाचाळ वीरापेक्षा
      कृतीने उत्तरावे
कृतीने उत्तरावे

## (४)
## धुक्याची चादर

निर्सगातल्या काही पर्यावरणीय घटनांमधल्या काही इतक्या गोड असतात ना कि नजरे समोर त्या आपला तलम पडदा धरतात आणि जवळच्या व्यक्तींना अजूनच नजरेतूनच जवळ आणतात. हे धुक्याचे पडदे असेच खोडकर, बदमाश, सौंदर्याने ओतप्रोत मनाला गुद्गुल्या करणारे प्रिय व्यक्तीला अजून नजीक आणणारे असतात. धुक्याची चादर ओढून लाजणाऱ्या वसुंधरेवर तिचा गगनप्रियकरही भाळतो, पुन्हा पुन्हा नव्याने या धुक्याने भवतालचा नकोसा भाग धुसर होतो, पण आपली जवळची व्यक्ती अधीकच जवळ आणली जाते. तिचे सौदर्य धुक्याने अधीकच उठून दिसू लागते. हे धुके कितीतरी ग्रह अपग्रह स्वच्छ धुवून टाकते अन् अंतरंगाचे चित्र स्पष्टपणे, स्वच्छपणे मनासमोर उभे करते. धुक्यातली ही गुलाबी सकाळ अनुभवलीय का कधी? नसेल ना तर जरुर जा धुक्यात प्रिय व्यक्तीसोबत. नव्याने रुप, आत्मरुप निहाळण्यासाठी. धरेला पुन्हा नवेली होताना पाहण्यासाठी, धुक्याची चादर पांघरण्यासाठी.

धुक्याची चादर आली
धरा ही अर्धओली
पाहता दिसते काय
दृष्य अदृष्य झाली

नभाला भरती येते
भुमीवर प्रेम वर्षाव
धुक्याच्या तलमवसनाचा
पडदा हो त्याला अटकाव

झाडावेलींवर हिमकन
फुलांवर दवबिंदू नक्शी
पाखळी यौवनात हसता
आनंदाचे भरते वक्शी

लज्जेने चिंब ओली
धरणी ही आज झाली
वस्त्र ओढता धुक्याचे
उमटली गाली लाली

वाकते वेल लाजुनी
दवांच्या थेंबाचे भार
स्पर्श हा कोमलतेसव
अंर्तबाह्य गारगार

लाजणाऱ्या प्रियेला
गोड उपहार आणला
माळ मोत्यांची गळ्याला
प्रियतम अजून भाळला

प्रियकर प्रेयसी तेच
    नव्याने भासती आज
शहारते अंग प्रत्यंग
    लेऊनी लाजेचा साज

लावण्य कुठे दडले
    प्रश्न मनाला हे पडले

रोजची धरा असूनी
    अवचित असे कसे घडले

धुक्याने हळूच दुर केला
    भवतीचा फापट पसारा
नजीकचे शिल्प सौदर्य
    अलगद येई आकारा



# (५)
# ऋतुंचे चक्र

सुख दु:ख असण नसणं, संपन्नता विपन्नता, प्रसन्नता खिन्नता अशा परस्पर विराधी घटनांचे भावणांचे चक्र जसे माणवी जिवनात सतत फिरत असते तसेच ते सृष्टीतही फिरत असते. जीकडे तिकडे भरभरुन सौंदर्य पांघरलेल्या वसंत ऋतूला उगाच थोडा गर्व होतो अन शिशीराच्या माऱ्याने वास्तव स्विकाराव लागतं. तरीपण अशी काहीतरी बाब असते जी सुकलेल्या झाडाला पुन्हा नवा बहर देते पुन्हा ते झाड नववधु सारखं नटून थटून डौलाने उभे राहते आनंदाने डुलू लागते. पानापानात सळसळणारे चैतन्य शिशीराचाही अहंकार हलवून सोडते जेव्हा जो ऋतू येतो तेव्हा तो भरात असतो. त्याचा प्रभाव सर्वोच्च असतो. पण दुसऱ्याच क्षणी दुसऱ्या ऋतूच आगमन होतं नि तो ऋतू खरा की हा असा प्रश्न मनात डोकावून जातो. खरतर दोन्ही ही ऋतू खरेच. आपल्याला जो ऋतू आवडत नाही तो आपल्याला नकोसा वाटतो. आवडतो तो हवासा वाटतो पण आपल्या वाटण्यापेक्षा वास्तव महत्त्वाचं असतं ना ही, आणि हे चक्र आहे म्हणून आतला आशेचा रस कायम जीवंत ठेवावा लागतो. मग वसंत वारंवार बहरा येऊ शकतो. बाहेरही आणि मनातही. हा मनातला बहर हवा तेव्हा मिळवता येतो खरचं हो मनातला बहर हवा तेव्हा मिळवता येतो.

हे चक्र ऋतुंचे ऐसे
परमेशाने निर्मीयले
गर्वात बुडाल्या वसंता
शिशीराने भानी आणले

सालंकृत श्रीदेहाची
निर्लंकृत काष्ठे होता
संयम खोडांतरीचा
झाडाला तो तगविता

फळा पाना फुलांचा जेव्हा
बहर ऊतू हा गेला
फुंकर मारून त्यावर
वृक्षास निश्पर्न केला

काळाचे बलशाली मग
चक्र फिरवुनी येते
मृतप्राय लाकूड येथे
नाजूक पल्लव लेते

तो गर्भ रेशमी शेला
अंगावर असा का आला
सिंपता हे सारे सारे
आतून जीवन रस ओला

वरहीनी कसे जगतेना
शब्दात मांडने नाही
देहावरच्या लेण्यांना
मरण यातना काही

पण येईल राजस माझा
आतुरतेने भेटाया

मिलनक्षण एक पुरेसा
उत्कंठ शिगा गाठाया

निशब्द तपांच्या पोटी
शब्द सुमन रामायण
वेदना माय होऊनी
प्रकटती वेद ज्ञानायण

अभिषाप मानता याला
कीं वरदानाची भुमी
नास्ती नास्ती च्या घोशे
अस्तित्व जानिले हो मी

# (६)
# होऊन धबधबा

आयुष्यात झोकून देण बरेचदा खुप महत्त्वाच असतं बरं. या झोकून देण्याने आपल्यातल्या साऱ्या क्षमता पणाला लागतात. आपल्या शक्तीचा अंदाज येतो. अंतर्गत सौंदर्याच एक रम्य बाह्यदर्शनही घडू शकतं. संथतेतलं छुप उसळणं दृगोचर होत. रंग, नाद, आवेश हे सार जणू नव्यानं भेटतं. एका नव्या आवेशात आपलच रुप गोजीरवान वाटतं. झोकून देताना आपली अधोगती तर होणार नाही ना अशी किंचीतशी भिती मनात चमकूनही जाते. पण डोळे बंद करून निर्धास्त पणे सोडून द्यावं. झोकून द्याव स्वत:ला एका वेगळ्या ध्येयाच्या आवेशात. उंच कड्यांवरून झोकून देऊन सुंदरतेच लेण ठरलेल्या त्या खळखळत्या धबधब्या प्रमाणे, होऊन धबधबा

होऊन धबधबा
कोसळूया जरा
झोकून उंचावरून
स्पर्शूया युगंधरा

डोंगर कड्यावरूनी
स्वत: सोडतो मी
कडा पायथ्यास ऐसे
कोसळून जोडतो मी

प्रियजनास कोणी
प्रेमात चिंब करते
माझ्या परि तयांच्या
मन धबधब्यास ये भरते

विश्वास तिच्यावर
घेईल झेलून ती
माझे उनाड पण
सांभाळेल जी

शुभ्र फेसाळत्या
धारा जणू दुधाच्या
उडती तुषार वेगे
क्षण वेळा मधुर मधाच्या

मी कोसळून अंगावर
मन मोर रंगात आणतो
शितल स्पर्श माझा
रोम रोमात ही भिणतो

ओघ पाण्यातला
ओठ वाहण्याची
मी न राहे माझा
मज त्वरा पाहण्याची

रव माझा मदांध भासे
भय रात्रीस आणणारा
शृंगार कोणी फुलवे
भिजताच ये शहारा

ओल्या तनामनाशी
संवाद नि:शब्द होतो
भाव प्राजक्त तेव्हा
बोलून सारे जातो

किती लाजतात ललना
रती होत कामदेवाच्या
शिंगार शिखरी जातो
शिव झाकतो त्रिनयना

येथेच कोणा दिसती
ज्ञानाच्या शांतीरेखा
तप चालते निरंतर
भंगण्याचा नाही धोका

मुनी ऐसे देखताच
लेऊन आत्मरस हा
मी होऊनी विरक्त
जगतात विरस ऐसा

कोणास वाटतो मी
अलंकार निसर्गाचा
अनमोल रत्न हार
घसरला की स्वर्गाचा

कोणास वाटतो मी
मंदाकिनीचा राग
येण्यास पृथ्वीतलावर
हा शाप की अनुराग

मी काहीच न पाहतो
बस कोसळतो कोसळतो
होऊन धबधबा
भुचरणाशी लोळतो

आवेगे ऊसळता मजला
ती सांगे शांत वाहण्या
रुपे दोन्ही धावे माझी
नदी सागरास पाहण्या



## (७) कोंब पाषाणातला

खडकाच्या उदरी कुठून बीज दडत असेल? खडकाच्या उदरी कुठून बीज दडत असेल? ते बीज कुठून पाणी पीत असेल? उगवणारा नाजूक कोंब पाषाणाच्या आधाराने वाढत जातो, बहरत जातो. त्याच मोठ्या झाडात रुपांतरही होतं. पण मनात अनेक प्रश्न जसे निर्माण होतात. तसेच ते अनुत्तरीत ही राहतात. कातळशार पाषाणातून हिरवा कोंब सजीवतेच प्रतीक होऊन डोलू लागतो. पण कुठून मिळतो त्याला तो चैतन्याचा झरा. कोण आत दगडातून धरून ठेवत असेल त्याच्या मुळा. दगडालाही मातृ हृदय कोण बहाल करीत असेल? वरपांगी रुपावर अंदाज बांधणाऱ्या जगाला या पाषाणाचे मन कळेल का? त्याचा तो डोंगरा एवढा भक्कम आधार त्या चिमुकल्या रोपाट्याला केव्हडी प्रेरणा देत असेल. कितीतरी प्रश्नांना नव्याने उत्तर शोधायला भाग पाडत असतो हा पाषाणाला चिरुन जगण्यासाठी धडपडणारा कोंब.

कातळ पाषाणातून
कोंब कोवळा ऊगवे
नाजूक पानं त्याची
रंग कोमल जागवे

उन्हा साठी ऊंच जाई
पाणी ते कोठून घेई
खडक पाझरतो
आतून आई होई

कठोर त्याच रुप
बाहेरून देखता
बीज हृदयी प्रमाचं
आत वाकून पाहता

किती निंदा कोणी करी
म्हणे वृक्ष हा डोंगर
एक इटकुले रोप
करी त्याला हो सुंदर

पाहून बाह्य रुपा
करू नये कधी मत
आत मृदूसा कोपरा
असे प्रत्येकाच्या आत

तो जेव्हा पाझरतो
एक भाव जन्मा येतो
अपवाद ही असाच
गोंडस खूप होतो

रोपट्याला पाहताना
होई डोंगर हळवा ना
आतली गुप्त गंगा
मुळाशी वळवा ना

आधार स्वकीयांचा
बहरण्याला पुरेसा
डोंगरा ऐवढा की
रोपाचा भरोसा

डोंगर रोपा पाही
हळूवार्ता ही माझी
रोप डोंगरा पाहता
कणखर मुळ त्याची

एक चैतण्याची लाट
वाऱ्यावर डोलता
कष्टातून उभा मी
कळे डोंगर बोलता

दूर अरण्यात गूज
चाले दोघांचेही रोज
साथ परस्परा देती
एक अनोखी ही मौज

कुठे जन्मलो हे
नसे महत्त्वाचे तितुके
कसे राखले जीवाला
सांगावे की इतुके

# (८) आभाळ भरू येई

उन्हाचे तडाके, दुखाचे चटके सोसत या भुईला आस लागते ती वर्षावाची ती वाट पाहते सर सर सरी बरसण्याची आभाळही भरून येत कित्येकदा पण ते बरसतच अस नाही. या ढगांना पिटाळूनही लावते कधीकधी सृष्टी. भरलेलं आभाळ पाहून बरसायच्या आतच स्वप्नांची धरणी ओलीचींब ही होते. सुसाट पिसाट सुटलेल्या वाऱ्यावर सारे सारेच चिडतात. ती धरीत्री, ते ढग, ती वीज त्याला ओरडतात. भरून आलेल्या आभाळाला बरसु दे बाबा पीटाळून लावू नको म्हणून जीवाच्या आकंताने सारे सारेच वाऱ्यावर खेकसतात. शेवटी भरून आलेलं आभाळ बरसतं अन् तरसलेलं प्रत्येकजण तृप्त होतं. मनातही आभाळ भरून येत कोणाच्या तरी, मनातही आभाळ भरून येत कोणाच्या तरी. कोणावर तरी बरसण्यासाठी.

आभाळ भरू येई
कधी वेळी कधी अवेळी
ते बरसत नाही
प्रतयेक अशा स्थळी

ते नभी भरू येता
इथे आस जागी होते
माणसाच्या स्वप्नाची
भोई ओलीचिंब होते

एक पिसाटसा वारा
जल भरल्या मेघाला
पिटाळण्या वाहत आहे
आसतो तो धरणीला

मोठ्या आवाजी गर्जून
ढग वाऱ्याला विचारे
तुझे वागणे कसे रे
ढग पळाले बिचारे

वीज कडाडून रागे
दात ओठ खात राही
तीळ पापड अंगाचा
चमकता लाही लाही

भुई वाऱ्याला विनवी
शांत राहा बाबा थोडा
किती मास उलटले
इथ चातक कोरडा

माझ्या काळजाला भेगा
हरपली वनराई
बरसुदे त्याला मुक्त
कण कण ओला होई

ओल्या माझ्या या मातीचा
गंध वाहण्या तु येशी
माझा आनंद ही सवे
नेरे मग दुरदेशी

येता पावसाची धार
रानं होई हिरवं गार
दाना पिकलं जानून
पक्षी थाटतो संसार

जीव जीव सुखावतो
तृप्ती मनात जागते
माय होऊन धरणी
पान्हा आनंदे पाजते

बरसून मेघ राजा
आभाळाला खाली आणी
मदो मनीचा आभाळी
पाहताच वृष्टी पाणी

भुई आभाळची होते
होते आभाळ ही भुई
असे एकरुप होता
मोर नाचे थुई थुई

मोर नाचता वनात
पिसं गालावरी फिरे
सृष्टीच्या सोहळ्याचे
साक्षी होते सारे सारे

आता आभाळ भरते
माझ्या मनाच्या आकाशी
बरसून तुझ्यावर
उरतो मी गंध कोशी



## (९) एक डोंगर उभा की

व्यक्तीला महान बनवणाऱ्या अनेक उत्तमोत्तम गुणधर्मामध्ये दान हा ही एक महत्याचा गुणधर्म असतो. दानाचा वसा माणसाने कुठून शिकावा बरे? कुठून घ्यावा बरे इतर माणसांकडून, घरच्यांकडून की निसर्गाकडून. निसर्गातला जवळ जवळ प्रत्येक घटक दानाची शिकवण देत असतो. ज्याला कळतं त्यालाच कळतं. दूर कुठे राणात उभा असलेला डोंगर श्रेष्ठ दाताच असतो. कसा काय? अस विचारलतनां हं खरय तुमचं. तो डोंगर दगड धोंड्यांचा गोळा तो काय दाण देत असेल? असा विचार सहजच येईल मनांत. पण बघाना हा डोंगर दाता होऊन एक दोन वर्ष शे दोनशे वर्ष नव्हे तर युगानयुगे उभाय बरका. अहो खरचं. काय काय देत तो, ऐकूया तर...

एक डोंगर उभा की
होऊन युगे दाता
वरुणाला अडवितो
बनून त्याचा भाता

भात्यात विसावले
क्षर येती सर सर
इथं युगंधरेवर
वर्षा राणीचा सत्कार

कुठे कोसळे माथ्याशी
पाणी मुसळधारेणे
आल्या पाण्याला दे वाट
डोंगरगा त्वरेणे

विखुरलेल्या पाण्यास
एक मार्ग मिळे छान
खळखळून वाहतो
एक श्रोत होई सान

जस जस येत जाई
पाणी पुढे वाहत आहे
देण्याच्या गुणधर्मे
धबधबा हो महान

कतृत्व डोंगराचे
परि लोभ ना किंचीत
जल जीवन तो देई
न राहण्या वंचीत

पाण्याला अमृताची
चव येई हो त्या क्षणी
गोड मधूर ते पाणी
चिर राहे अंतरमनी

खिळे अल्लड ते कोणी
चिंब ओल्या बालपणी
जलक्रिडा त्या यौवनी
धुंद साजन सजनी

जि निसटून जाते
वाटे तिरी वृध्दपणी
कोणा काहिही वाटावे
पाणी पुढे वाहत आहे

मग राबत्या हातांनी
भुई अंकुरत आहे

पाण्याचा होई दाणा
मुखात जातो जेव्हा
डोंगर धबधबा
कृतकृत्य होई तेव्हा

काय सांगतो डोंगर
जे आहे सारे द्या ना
देण्यात सारा आनंद
एवढसं समजून घ्या ना

दाता राहतो अढळ
ऊंच डोंगरा सारखा
दानाचे पुण्य होऊन
होई दु:खाला पारखा

सारं देऊन डोंगर
होई सौदर्याचा घाट
दानाने मिळे मान
सारे विश्व पाही थाट



# (१०) एक रम्य ही पहाट

रोज सकाळी जाग येण्यापूर्वी एक सोनेरी पहाट होते. सृष्टीत अनेक रंग उधळले जातात. आकाशाच्या पडद्यावर तो परमेश्वर आपल्या अदृश्य कुंचल्याने असे काही रंग चितारतो की अतुलनिय चित्र दालणच उभं राहतं. चैतन्याच भांडार उधळीत सूर्य नारायण पुर्व दिशेला येतो. तो प्रकाशाचा मालक देत जातो प्रेरणा, उर्जा, तेज आणि आयुष्यही. तो आहे तो येतो म्हणून आपण जगतो. तो कधीच थकत नाही रुसत ही नाही. विश्रांती तर घेतच नाही. कर्तव्यात कसुर मुळीच नाही. सतत कार्य तत्पर असा तो सुर्व्या, त्याच्या सारखं जगावं ना आपणही.

एक रम्य ही पहाट
सुर्या बघा उगवला
रंग लेऊन स्वर्गाचे
चित्त जागवण्या आला

पक्षी किलबीलती
झेप घेत हो आकाशी
झाडं डोलं आनंदाने
रेखी एकरम्म नक्षी

एक रंग दुज्यामध्ये
मिसळतो असा काही
माझ्या देवाच्या कलेला
कुठं कुठं तोड नाही

आदित्य देवा रोज
हात जोडते नमुन
चैतन्यच सांडतो हा
नचूकता येऊन

राती डोळा लागे डोळा
प्राण होती कुठं गोळा
न्हाई शुद्ध तवा कोणा
रोज नभी ये पाहुणा

कधी कार्याला न चूके
सारे तेज्यापुढे फिके
ब्रम्हंडातून फिरता
नाही होत कधी रिता

रोज दिसतो म्हणून
जिथं जागती माणसं
त्यो नसलं तर हो
सांगा ओसाड रानंच

अशी सुंदर पहाट
देवा बघावी की सदा
माझ्या घरादाराला रे
देई आशीश समदा

आणि काय मागू तूला
देवा सूर्या तू तेजाळ
कष्ट करून जगावं
नगं मोहाच हे जाळ

मला एकच कळतं
तुझ्यावानी मी वागाव
देत प्रकाश साऱ्या
दिवा होऊन जगावं

## (११) तेजोगोलक सूर्य देखणा

निळ्याशार पाण्याचा अथांग सागर. प्रभातिची वेळ, उगवतं सोनेरी, सुंदर, तेजोमय सुर्यबींब. पाण्यातल अवर्णीय प्रतिबींब. नीळ जळातून संधपणे पुढे हाकत जाणारी होडी. अशा होडीत आपण. आपल्या शरीरात रसीक अस मन. रसीक मनाने प्रभातीच्या सौंदर्याचा घेतलेला ठाव. मन क्षणात पाण्यावर तरंगत राहणारं तर क्षणात कुठल्यातरी पंखांच्या बळावर आकाशात पोचणारं, किती प्रसन्न असेल मन अशा पाहटेला. जगण्याचा सुंदर अर्थ कळेल नाही या अशा पाहटेला. कर्तव्य तत्पर रवीराज पूर्व दिशेला उगवताना. निश्चिंत मनानं बघणं. निवांत क्षणांना जगणं काय भाग्यात लिहून आणावं लागतका. हं हं मुळीच नाही. निसर्ग सौंदर्याची लयलुट करण्यासाठी आपल भाग्य आपणच रचावं लागतं. प्रचंड सकारात्मकतेनं सतत निसर्गाच लावण्य डोळ्यांनी मनात, मनानं अंतरआत्म्यात भरुन घ्याव लागतं. मग काय आपल्या सारखे भाग्यवान आपणचं.

दिनकर निलांगणे प्रभाती
नील सागरी नौका
पाण्यावरती बिंबच का के
त्यात हवेचा झोका

निल मन्यांवर सुवर्ण कण
हलकेच तरंगत येती
लाटांवरती सोन सळी
चांदण्या विरहत जाती

पाण्यावरती दिवे तरंगती
सूर्याने लावलेले
निलवर्न जलांगणी बघ
दिप असे तेवलेले

स्वर्गाचा दिप्तीमान खंड
आकाशातून पाहतो
नभसागर अन सूर्य तेजाचा
मेळ अनोखा होतो

अशा क्षणाला नवके मधुनी
बसून शांत तरावे
पंख लेऊनी आकांक्षेचे
खग होउन विहरावे

सौदर्याच्या सर्व कल्पना
इथे फिक्या पडती
नवपरीभाषा अर्था येऊन
लावण्य ये झडती

तेजो गोलक सूर्य देखना
आकाशाचा राणा
कांतीप्रभेच्या लाटा उठती
त्यावर आरुठ व्हाना

## (१२)

## उंच उंच वनराजी हिरवी

बालपणीची मैत्री, त्या मैत्रीतली निखळता. जोडीला छान वनराई अगदी बहरलेली उंच उंच आभाळाला टेकलेली. हिरवा शालू नेसलेली, पाचुचेच दागीणे घातलेली. मनालाही अगदी ताजी तवानी करणारी. फुलणारं मन हिरवं गार करणारी. मनातली प्रिय अशी कोणी मैत्रीण. शांत निर्जन अशा या वनराईच्या रस्त्यावर सोबत जर असेल तर. तीचा हात हातात घेऊन चालताना भवीष्याच चित्र स्पष्ट होत जात असेल तर. निसर्गाच्या साक्षीनं अबोल मन तिला बोलून जाईल का मनातलं सारं. उद्याच काहीतरी सुरेख चित्र न्यारं आपण मोठे झालो तरी असं एखादं सोबतीच चालणं सोबतीनं वनातला मारलेला फेरफटका मनात असतोच ना घर करुन, ते प्रिय माणूस जवळ असतानाही आणि नसतानाही.

उंच उंच वनराजी हिरवी
तिने हिरवे पाचू पांघरणे
आनंदाने डोलत असता
कडे कपारी गोंजरणे

नयनरम्य दिसत असे परिसर
स्वच्छ तयातून रस्ता सुंदर
निर्जन स्थानी मनही शांत
सोबत तू मज असता निवांत

चल चालून घेऊन हाती
हात परस्पर मित्रत्वाचे
जगणे दुसरे काय असावे
सांगत जाते अतूट नाते

आतुरता झाडांना कळते
तेही मनाला समजुन घेती
खांद्यावरती टेकव डोके
ते पंखा वाऱ्याचा बघ धरती

ते साक्षी असतात खरे गं
वाणी आपुली नसे तयांना
ऋतू राजाला घेऊन संगी
रमवती बघ आपुल्या प्रियेला

वरुण धुक्याला पांघरुन वधू
वनराजाची सजली धजली
तु मी लहान तरी भाव जाणते
मनात माझी तु संगीनी रुजली

असेच राहो प्रेम आपुले
मैत्री त्याचा धागा असुदे
आज इथे चालतो पाऊले
भविष्यात ही चित्र दिसुदे

## (१३)

## आला रे आला रे पाऊस

पावसाचं येणयं ना किती जनांना सुखावनार असतं. मोर आणि पाऊस यांच नातं युगाणयुगे अतुट मानलं जातं. पाऊस येतो वनराई हिरवा शालू नेसते, ढगांचे चौघडे वाजू लागतात, अन सृष्टीच्या या विवाहात मोर जणू मनापासून नाचू लागतात. ढगांना पाहताच खुश झालेला मोर संपूर्ण पिसारा फुलवून बेभान होऊन नाचू लागतो. मनातले मोरही असेच नाजू लागतात. रानात हे दृष्य पाहणारं क्वचीतच कोणीतरी असतं. ढग पाऊस गडगडाट सुऽऽ सुऽऽऽ करत अस वाहणारा वारा, मोरांचे केकार नाचण्यात दंग असलेले ते मोर पिसारा फुललेला त्यातून गळालेले मोरपंख धरेवर सांडलेले ते पंख चित्रच सारं बोलून जातं. मोराच अण पावसाच सुंदर नातं वनात कोठेतरी डोलून जातं. कितीतरी खुलून जातं.

आला रे आला रे आला रे पाऊस
घेऊन हिरवाई
मोराच्या भेटीला जीवलग सखा नं
त्याला भेटीची नवलाई

मान करून करून करून वर
देत राहतो आरोळी
थांब थांब थांब मेघा थांब जरा
दिन आले रे पावसाळी

मी नाच नाच नाचतो सख्या
बघ फुलवित पिसारा
मोरपंखी रंग सांडता बहरते
बहर बहर ही धरा

मी तुला पाहतो तुरा मिरवूनी
वनात तू येता
राजा बनूनी सिंहासनी वनी
केकारव गाता

आज मोद आनंद सापडे
खूप खूप इकडे
मान वळविता दिसतो पाऊस
मज जिकडे तिकडे

थेंब झेलतो निलकंठ मी
सुंदर तम खगराज
आला पाऊस आला पाऊस
फुलवुन पिसारा आज



# (१४) चहाचे मळे

घरात कोणी पाऊल टाकलं ना टाकलं की पाहूनचार म्हणून चहाचा स्वागताला हसत हसतं येतो. गृहीणीला ही कृतार्थ वाटतो, निदान चहातरी देता आला म्हणून. एखाद्याच्या घरी चहा पिऊन आल्याच्या आनंदाने आदरातीथ्य सन्मानाने येणाराही सुखाऊन जातो. घरधन्यालाही आनंदाने कोणालातरी चहा पाजून पाठवले म्हणून दिलासा वाटून जातो. या सुकलेल्या चहाच्या पानांची हिरवी हिरवी गार पाने, ते पानमळे काय खुणावतात माहीतीये? एखाद्याच्या घरातली चूल या चहाच्या पानांना खुडण्याने पेटती राहत असते, तर एखाद्याची घरातली चूल रात्रंदिवस चहासाठी पेटतीच राहत असते. पाठीवर जाळी जाळीची टोपली लटकवून पोटासाठी चहाच्या मळ्यात पाने खुडायला जाणाऱ्या एखाद्या स्त्रीसाठी हे चहाजचे मळे म्हणजे पोटाची सोय तर असतेच असते, पण पोराबाळांचे सोनेरी भविष्यही असते. इतरांना मळ्यात पानं खुडणाऱ्या स्त्रीचं दु:ख मोहक वाटतं राहत तर तीला ती पानं खुडनच मोहात पाडत राहतं. अशीचय मोहिणी चहाची साऱ्या साऱ्यांवर.

मळे हिरवे हिरवे गार चहाचे
मऊ मखमाली हरीत वरणाचे
मज रोज खुणावती ते जवळी
मज बोटांना त्यांची नवाळी

पाठरवर घेऊन करंडी
जाळी जाळीची वेत टोपली
सकाळी सकाळी खुडण्या पाने
तयार ललणा काम सुगरणे

ना कंटाळा कधी या कामी
चैतन्याची डोले पालवी
हाताने तोडून पाठीवर
टाकीत गाणे ती गुणगुणी

चहाच्या मळ्यांनी असे पेटलेली
घरातील चूल कधी विझलेली
तुमची सकाळ अन संध्याकाळ
चहाने माझे जीवन प्रतिपाळ

मी चहा न खुडते, सुख पर्ण तोडते
हिरवे हिरवे घरदार वाढते
मुले बाळे ही शिकली माझी
घेऊन आठवण इथली ताजी

मळे असेच पिकूदे देवा
चहा पानांचा सुवास यावा
माझ्या रानाला साहेबी थाट
त्याच्या दिवानखान्यात ऐट

घरा घरात सजून बसला
आता चहाच स्वागती हसला
कप भरून येता सामोरी
सारा थकवा जाताना दिसला

## (१५) मधुराणी सकाळ

सकाळच सौंदर्य किती प्रकाराणी वर्निल तरी ते अपुरच ठरेल. आपल्या भावना निसर्गावर आरोपीत करुन निसर्गाशी आपलं तादात्म्य साधण्याचा प्रयत्नही मोठा सुखद असतो बरं. क्षितीजही निसर्गाच असच एक भासमान पण हवं हवंस वाटणारं वात्सव असतं. क्षितीजावर होणारं गगण धरेच मिलन तर सुखाची सर्वोच्च अनुभुती देणारं ठरतं असतं. ती रक्तीमा, ती लालीमा धरेची लज्जा जणू सुचवत असते. त्या दोघांमधल प्रेमळ वागणं निसर्गही मुक्त हस्ते जणू उधळत असतो. ती रोजच सकाळी जणू नववधू होते. आकाशाच तिच्यावरच प्रेम किती किती नव्या नव्याने पुन्हा पुन्हा रोज रोज बहरत जातं. ती बावरते तशीच जराशी सावरते. एक रम्य सकाळ आपल्या पदरी पाडून घेण्यासाठी नव्या आशेने पहाटेला उठून अशा सुरम्य ठिकाणच्या लाघव वेळा पापणीत साठवताना अनिमीश नेत्रानं उपस्थित राहावं लागतं. ती क्षितीजावरची भेट अनोखी साठवून परतूच नये असं वाटतं. एका अशाच गोड सकाळच्या शोधात.

क्षितीजावची लालीमा
सरोवरात बिंबीली
आकाशाने पहाटेला
हळूच धरणी चिंबीली
लाजली ती लाजली
क्षीतीजापाशी थांबली
लाल लाले लाल गाल
पाण्यात लपवू लागली
धून घेता जळा मध्ये
कपोल लाली उतरली
धरा अजूनच क्षीतीज्याच्या
कुशीत लपून बावरली
त्यातच बींब नारायणाचे
प्राची वरती अवतरले
निद्रेत गुंगल्या विश्वाला
प्रेम तयांचे हे कळले

अशा लाघवी प्रणय वेळा
रोज सकाळी धरणीला
निशा कुशीतून उठवत येतो
आभाळ सखा बघ तरुणीला
ती बघते उठते आपुलकिने
त्याचे स्वागत करण्याला
सृष्टी रंगते त्या दोघांच्या
रंग गोमट्या मेलनाला
जाग जागला शुभ्र पतंग
शोधत हंशी राजहंस
तिच्या मिलना उत्सुक तो की
अशा वेळेला असीम दिगंत
झाडे जागली पानो पानी
उत्फुल्ल तयांचे दिसती रंग
प्रतिबिंबाने दोन वाटती
सृष्टी राधा नभ श्रीरंग

# (१६) आला पाऊस भरात

निसर्गाची रुप वेगवेगळी असतात, कधी सौंदर्याने नटलेली तर कधी बोडख्या धरीत्रीला दुष्काळानं पेटवणारी. जनावरांना चारा नाही माणसांना पाणी नाही. पाऊस न पडण्यान सगळीकडे वृक्ष वृक्ष सुकून गेलेले गवत, चिरलेली जमीन भेगाळलेली शेती. वाळून सुकून कडक झालेली ठेकळं. चातकासारखीं वाट पाहणारी सारे सारेच. तशात बेभरोशाचा पाऊस अचानक पडू लागला तर खांद्यावर नांगर घेऊन शेताकडे धाव घेणाऱ्या माझ्या शेतकऱ्याच मन समजून घेऊया. भावाच्या लगबगीचं वर्णन तरी किती करावं दुष्काळाची आठवणही नकोशी वाटणारी. पावसाचा तर नेमच नाही, पण भिजलेल्या मातीच्या कुशीत बीयानं रुजलं म्हणून धावणारा तो इतरांनाही घाई करणार यात शंकाच नाही. धावतोय तो बघा शेताकडे.

पावसाळी पेरणीला
नांगर खांद्यावर घेत
बैल जोडी हडकुळी
मुस्क्या बांधून सोबत

दुष्काळाची आठवण
तो आताशी थोडा आला
पाऊस नेम नाही नेम नाही
म्हणत, गडपही झाला

तरी तयारी करावी
शेताची नांगरून
थोडी बीयानें टाकावी
की धरीत्रीच्या की कुशीत

तीची कुस ओलवावी
बीज डोकावे शेतात
चारा मिळो जनावरा
घास पडावा मुखात

आता चला रं गड्यांनो
बिगी बिगी शिवारात
रमु नका हिरव्या चारी
आला पाऊस भरात

# (१७)

## भकास वास्तु अंकुरलेली

एखादा प्रसाद, एखादी भव्य वास्तु केव्हडी समृद्ध असते नाही ऐकेकाळी. तिथली लगबग, तिथला वावर सारा साराच राजेशाही. समृद्धतेनं ऐश्वर्यानं नटलेल्या या वास्तूच काळचक्र फिरल्यानं रुपांतर होत ते एखाद्या खंडरासारख्या भकास उदासवाण्या तुटक्या फुटक्या अवशेषात. बघूनही वाईट वाटतं. या वास्तूनं किती लवाजमा पोसला असेल नाही दिमाखात. राजेशाहीच्या थाटानं नटली असेल, मुरडली असेल ही वास्तु कधीकाळी. काय गाजावाजा असेल तिचा. स्वागत समारंभ असतील. जन्माचे विजयाचे विवाहाचे सोहळे झाले असतील. पण आता, पण आता या वास्तुलाही भुतकाळ आठवून गलबलून गलबलून येत असेल. सगळं सुकलेल्या, खंगलेल्या, भंगलेल्या या वास्तुला देखील अंकुराने नव स्वप्न दिसत असेल ना? अंकुरलाय बघ एक कोंब तिथे.

पहा ही वास्तु रम्य होती
पण भुतकाळ उदरात गडपली
खडका फोडून रोप ऊगवले
ऊमल फुलांनी ती पालवली

इथे नांदल्या इतिहासाच्या
खळखळत्या प्रासाद खुणा
युगायुगांच्या प्रतिक्षेतुनी
अश्मास उमाळे येई पुन्हा

ओसाड वृक्ष त्या दगडांमधूनी
कोंब कोवळा पोशीयला
पांग फिटत असे कधी ना कधी
नवजीवन अंकूर देखीयला



## (१८) झरोका झरोका

निसर्गरम्य असं एखादं ठिकाण. धुक्यान आपलं साम्राज्य पसरवलेलं, छानसं निवाऱ्याचं ठिकाण. मोठ्याश्या दिवानखाण्याला मोठीशी खिडकी. खिडकीला पारदर्शी अस काचकाम. तो इतका नितळ की सारा दिसर्ग खुलत आलेला अन् क्षणात आपण खोलीतून धुक्याच्या त्या रम्य धुंदीत वीरघळत जातो. मधेच जाणीव करून देणारा वाफाळलेला चहाचा कप हाती. आत गर्मी जाताना बाहेरची धुक्याची शितलता कोणाला खुणावणारी. सोबतीला गुलाबाच्या फुलांची गुलाबदानी. सुंदरश्या रम्य सकाळचे गंधच लेऊन येणारी सहचारीनी, ती ती धुक्याची सकाळ रात्रीचा मोहक सुगंध, वाफाळता चहा, मोहक निसर्ग अन् सर्वांना जोडणारी ती पारदर्शी खिडकी. हं तो सुंदरसा झरोका.

झरोका झरोका
असा पारदर्शी
घर दिसे डोंगराला
धुकं बिलगे डोंगराशी

इथं वाफळला चहा
डोंगराला की तल्लफ
कुडकुड थंडीमध्ये
गरमा गरम पेय उऽऽफ

कप भरला चहाने
नजरेत थंडी भरा
फुटे पाझर पाषाणा
दव गोळा भर भरा

आत गुलाब फुलदानी
खिडकीतून डोकावे
होतो बाहेर दवात
जरा घरातून निरखणे

गवाक्ष लांब रुंद
पारदर्शी एक छंद
सारी दृष्टी जाय तेथे
सृष्टी भर्ररकन बंद

सकाळ थंडीतली अशी
जवळीक साधनारी
ऋतू सवे मनातल्या
भावनांना लाभणारी

थंडी थंडी ऊब
आणि मन प्रमाणे वाफाळे
पेय अमृताचे घेता
भाव आतून उफाळे

त्यात तीचा सहवास
सांज सकाळ ही एक
दिस तिलाचं पाहतो
रुप दिसं वेगळेच

माझे प्रतीबिंब ती
तिचे मी ही होत आहे
अशा ऋतू मिलनाला
जीव बरसतो आहे

## (१९)
## सुरम्य रस्ता

सृष्टीतल्या सुरम्य स्थळांना कधीच कमतरता नसते. मुक्त हस्ते उधळन करत असते वनदेवी गणूकाही साऱ्या साऱ्या अप्रतिम लावण्याची. स्वप्नातला सुंदर मार्ग चालत जावा, तसाच एखादा उंच डेरेदार झाडांच्या समोरा समोरील रांगांच्या मधून जाणारा गोंडर रस्ता दिसावा. समोरा समोरील ही झाडं आपापल्या फांद्यांच्या हातांनी दुसऱ्या झाडांच्या फांद्यांमध्ये आपले मैत्रीचे हात जणू गुंफतायत असे वाटावे. हिरवट लालसर त्या पानांचे रंग विलोभनिय असेच दिसावेत. मधल्या रस्त्यावर या लालसर पाना फुलांचा दाटसर सडा पडलेला असावा. या मऊ मखमली गालीच्या वरुन चालताना आपण स्वर्गातलाच एखादा मार्ग सुखाने चालतो आहोत असे वाटावे. याच रस्त्यावरून तो स्वप्नीचा राजकुमार दौडत दौडत यावा, हळव्या मनाला संगती घेऊन. काय अवर्गीय चित्र असेल नाही हे?

एका ओळीत रांगेत
डेरेदार अशी झाडं
त्यांच्या पानांच्या पसाऱ्यातून
ऊन खाली खाली पडं

पानं हिरवी गार लाल लाल
मिसळून एकमेकांत
उन्ह अंगावर झेलून
आले पिवळ्या सोनेरी रंगात

पायी पसरे गालीचा
स्वप्न मार्ग मऊशार
फुला पानांच्या जाळीत
सोन चित्र चमकदार

मला भेटेल इथेच
माझ्या मनीचा देखावा
निवांत क्षण सोने
इथं आनंद लुटावा

कुठून येईल का
राजकुमार मनीचा
हळव्या राजकन्येसाठी
फुले ताटवा वनीचा

पानं सळी तीचा स्पर्श
वेड्या निसर्गाचा हर्श
पहूडला जरा इथं
वारा शांत निवांत

स्वर्गीय सुख वाटे
रंग आसमंती दाटे
स्थिर चित्राचे सांगणे
जणू झाले हो बोलके

# (२०)
## प्रसन्न सकाळ

आपलं आयुष्य प्रत्येक सकाळीनं नव्यानं भेट केल्यासारखच ठरतं नाही. नवीन उषा नवीनच आशा, नव्या प्रेरणा नव्या चेतना, सूर्य तोच दिशा ही त्याच तरीही नव्या जगण्यास नवीनच आस. तो सूर्य प्रियकर असेल का? ती उषा ती सकाळ त्याची प्रेयसी तर नसेल ना? ती पुढे पुढे पळताना तो तिचा पाठलाग करून तीला कवेत घेतोच ना. ती ही सुंदर सोनेरी वस्त्रे लेऊन नव्यानं लावण्यवती होतेच ना. सकाळचं हे चित्र कितीदाही पाहिलं ना तरी त्यातलं सौंदर्य तसुभरही कमी होताना दिसत नाही. उलट ते कितीही पाहिलं तरी ते पाहतच रहावसं वाटतं. निरखतच राहावसं वाटतं. अशी सकाळ रोजच सकाळी येतच राहावीशी वाटते. ती आहे म्हणून आयुष्य सुंदर आहे. आह्ष्य सुंदर आहे म्हणून ती ही हवीहवीशी आहे. रोज रोज अगदी आयुष्यभर

नव्या दिसाची नवी सुरुवात
आयुष्यावर कर बरसात
प्रसन्न सकाळ ये झोकात
होडी तिची सुखसागरात

पहिले काम ती हे करते
आधी अरुणा पिटाळते
सूर्य रथाला सज्य ठेवण्या
सांगून ती पुढे पुढे चालते

दिनमनी रथा रुढ होऊनी
पिवळ्या केशरी झाकी मधूनी
प्राची वर ती पसरून तेज
डोकावतो आकाशा मधूनी

बींब तेजाचे उर्जेचे
दिसते सकाळी स्फुर्तीचे
पक्षी गवसणी घालती नभा
पंखात रवी बळ भरण्याचे

ढगा ढगांना रंगीत वेश
किरणांचा सर्वत्र प्रवेश
आकाशाची ललना खुलते
रोज स्वतः वर स्वतः भुलते

उषा लाजरी प्रियकर रवी
तिच्या मागावर तो सरसावी
ती पळते जरी पुढे पुढे
कवेत त्याच्या ती सापडे

सुखद सकाळ रम्य दिशा
वसन सोनेरी नेसे उषा
अलंकार तिचे कांचन पिवळे
मुख चंद्रावर नवीन आशा

अशी पहावी रोज सकाळ
हृदय कोंदणी सुरेख माळ
आयुष्याच्या भाळ पट्टकी
ईश्वरा दे नित शुभ सकाळ

# (२१)
# इंद्रधनु शेतात उतरले

निसर्गाजवळ कसलाच भेदभाव नसतो. त्याला गरीबी, श्रीमंती, उच्च, नीच अजिबात समजत नाही. निसर्ग सर्वांना सारखेच भरभरुन देतो. ज्या झोपडीत रोजचा दिवा पेटवणं कठीन असतं तीथं दिवाळी घडवतो निसर्ग. तिही भल्या पाहटे. हं सकाळी सकाळीच खुशीचे सप्तरंग घेऊन इंद्रधनु अलगद उतरतं अन् पृथ्वीवर रेंगाळतं. पृथ्वीवरचे रंग पाहून तेही मोहित होतं. रंगाचे उत्सव पाहात तेही हरखुन जातं. स्वर्ग आणि पृथ्वीच प्रेमळ नात विवाहात जणू अडकत अन अडकलेलं मन इंद्रधनू मोठ्या शिताकीनं सोडवतं. श्रावणाला या इंद्रधनुची अन इंद्र धनुला श्रावणाची खुप ओढ असते. तर आपल्याला या दोघांचीही असा श्रावण इंद्रधनुला आयुष्यात घेऊन येऊदेत मग माझी झोपडीही राजप्रासादाला फिकी पाडेल ती वेगळ्याच सप्तरंगात न्हाऊन निघेल.

इंद्रधनु शेतात उतरले
झोपडीवरती रंग पसरले
आज गरीबा घरी दिवाळी
ती पण साजरी होते सकाळी

वसुंधरेचा हिरवा पिवळा
पोपटी असा शृंगार पाहण्या
इंद्रधनुला मोह जाहला
मोहीत तो तिज स्पर्शन घेण्या

आकाशाशी नाते तिचे
इंद्र चाफाने रेखीयले
सप्तरंग उधळून मस्तीने
तिला गुलाबी अधिकच केले

डोंगर हिरवे रानोमाळ
शेते पिकली ती अळमाळ
रंगांचा गोडवा मिसळला
रंगीत मिश्रण दिसे कमाल

श्रावणातले चित्र देखणे
स्वर्गामधला चित्रकार
रंग तयाचे कधी न संपती
रंग सोहळे वारंवार

काळ्या काळ्या जमीनी मधूनी
रंग बहरती फुला फळांतुन
निळ्या निळ्या आकाशातून
रंग छटा जातील पसरून

इंद्रधनुची कमान जणू ती
स्वर्ग पृथ्वीचे विवाह मिलन
सुर सनईचे सृष्टी छेडते
मंगल अष्टके शेतामधून

पडती अक्षता धरीत्री वरती
बीज होऊनी त्या फळती
अन्न ब्रम्हाचे आशीर्वाद
क्षूधा शांतीतून मग मिळती

असे देखने चित्र हवेसे
श्रावण राजा दाखवतो
उत्सव नांदी पृथ्वीवरती
संवत सरभर राबवतो

# (२२)
## दिवस उजाडतो चैतन्याने

सूर्य उगवताच सारी सृष्टी कशी नव्या तेजाने उजळून निघते. साऱ्या आसमंतात रंगोत्सव सुरु होतो. पशु पक्षी मधूर किलबील करु लागतात. झाड वेली तरतरीन डोलू लागतात. नदयांना सागराकडे जाण्याची तीव्र प्रेरणा मिळते. सकाळ सगळ्यांसाठीच काहीना काही घेऊन येते. जेवढी शक्ती, तेज, कांती चैतण्याची पखरण पाहटेला होते ना, ती इतर कोणत्याही वेळेला होत नाही. हे चैतन्य लुटून घेता आलं पाहिजे. आरोग्याचा मंत्र पाहटेलाच जपता आला पाहिजे. अंथरुनात लोळत पडलेल्यांना हा प्रचंड सकारात्मकतेचा वसा कसा वसता येईल. निद्रेतल्या स्वप्नात रमलेल्याला स्वप्नपुर्ती कशी करता येईल. लवकर उठून प्रभाती सृष्टीमधले प्रेरक कणन कणं वेचावे लागतात. मग दिवसभर आणि आयुष्यभरही हा चैतण्याचा दिवस सतत पाठिशी राहून यशाचा मार्ग चालायला लावतो. सकाळी उठून निरखूया या सृष्टीतल्या सुंदर बदलांना.

दिवस उजडतो चैतन्याने
उठून ते साठवून घ्यावे
कि अंथरुनात लोळत पडून
प्रकाश सोहळ्या गमवावे

भल्या पहाटे प्रसन्नतेचा
आकाशातून पडतो सडा
वेचून घेऊन शरीर मनाला
उत्साहाचा द्यावा धडा

किलबील किलबील
चिमनी पाखरे
दैनंदिनी सुरू करिती
इवल्या इवल्या कंठांमधूनी
सृष्टीची हे गीत गाती

नदी झुळझुळे आनंदाने
मार्ग पुढे चालते
सागरास भेटण्या अंतरा
प्रभातीस ती काटते

झाडे वेली ताज्या तवान्या
झटकून अंगा होती
फळे फुले सावली देण्यास
सरसावून येती

आकाशातुन ना ना वर्ण
धरीत्रीस स्पर्शती
इंद्रधनुचे रंग चांगले
रोज तिच्यावर बरसती

सृष्टी सारी जागी होऊन
कार्यास गती ती देते
आपण उठून तिला पाहता
मन उभारी घेते

झोपून नुसते स्वप्न पाहता
कोण पुरे करणार
अंथरुन हे झेलून तुम्हा
थकलेले असणार

प्रात काळी उठून मग
स्वप्नपुर्ती साठी धावावे
कवेत चटकन येईल तुमच्या
त्याला प्रयत्ने गाठावे

उठता सकाळी आरोग्याची
साथ लाभते उत्तम
शरीर मन हे दोनी प्रसन्न
अन प्रेरीत अंतरमन

देवांचे दिव्यत्व सापडे
आकाशातून प्रभा
रोज उठूया ब्राह्म मुहूर्ती
ज्ञान मिळवते आभा



# (२३)
## एकट्याने चालणे

जगताना भवतालचा कोलाहल इतका नको नकोसा होतो ना कधीतरी. शांत निवांत निर्जन स्थळी जावसं वाटतं तेव्हा मनाला. उंच उंच झाडांवरची पालवी नुकत्याच पडून गेलेल्या पावसामुळे रस्ते स्वच्छ धुतलेले. सृष्टीच ते गोड सौंदर्य साऱ्यांनाच भुल पाडणारं. अगदी निवांत असे ते क्षण. तेव्हा कुठे मन जरा मनाशीच बोलू लागतं. जरा जरासं शहाण्यासारखं तेही तेव्हा वागू लागतं. एकट्यानं चालणं किती आनंददायी असतं ना. शेवटी एकट्याचीच ही वाट, एकट्यानच चालली की सारे बाह्य कोलाहल संपूर्ण सृष्टीच गाणं ऐकता येतं. मन मनाला तिथचं पुन्हा पुन्हा घेऊन जातं.

गगनचुंबी वृक्ष राजी
पालवीने व्यापलेली
मागे धुतला नितळ झाला
वृष्टी त्यावर ओतलेली

आकाशाला गवसताना
तळ असावा स्वच्छ की
पारदर्शी मार्ग अथवा
भुमीतलही सावरी

हिरव्या हिरव्या रानी जातो
वारा काणी सांगतो
रथ कुणाचा मंद चाली
आज येथे चालतो

भूल पडते सृष्टी साठी
गोडव्याचा सोहळा
वाट इथली सोडवेना
अन निवांत ह्या वेळा

मन जराशे बोलतेना
ते स्वत:शी डोलतेना
एक रुप होता जराशे
कळते सृष्टी मोलना

एकट्याने जीवनाचा
मार्ग चालणे सुंदर
जगजणांच्या कोलाहली
व्यर्थ हेतू धुसर

चल पुन्हा स्वीकार पांथा
एकल्याने चालणे
एकशील मग तेव्हा तुही
रानसृष्टी बोलणे
रानसृष्टी बोलणे

## (२४)
## निशा उषेचा खेळ रंगला

माणसाला निद्रा मिळणं आणि पहाटेला उठून नव्याने जागणं या दोन्ही गोष्टी खूप महत्वाच्या असतात. दिवसभर राबराबून अंथरुनावर पडताच शांत झोप लागणारा सुदैवीच असतो. उत्तम आरोग्याचं ते लक्षणचं असतं. मन निवांत असल्याच ते चिन्ह असतं. थकलेले अवयव कसे झोपेने ताजेतवाने होऊन जातात. अन पहाटेला सूर्य उगवला की उठून पुन्हा नव्या प्रेरणेने कामाला लागतात. त्या निशेच्याच उदरात तेजाचा गोलक आकाराला येतो अन निशा तेजाची माय होते. बर हा उगवलेला देखणा सूर्य उषेच्या प्रेमात पडून तिला जीवनसाथी म्हणूनही निवडतो. रोजच पहाटेला पूर्व दिशेला हा शुभविवाह आकाराला येतो. साकारत जातो.

ये रात्र मुकूलीते
गात्र नमविते
देह तुझ्या स्वाधीन
निद्रा येऊ दे सुखासिन

तनुभाव निजले
दिप शांत विझले
शांत स्वपा लागली
तरी स्वप्नी कोण जागले

मधुर निद्रेची करू सांगता
अरुणोदय सूर्यास आणता
पित रक्तिमा आकाशातून
किरणांची लावण्य देखता

तेज पुतळा कांती चितळा
भास्कर उदयाचला
प्रेरणेच्या किरण हस्ते
जीवन वितरण कला

निशा देवीच्या गर्भामधूनी
उज्ज्वल बींबोदय
उशेस हाती घेऊन जगती
तेजोमय परिणय तेजोमय परिणय

# (२५)
# दुर्दम्य इच्छा

परिसर सभोवतालची परिस्थिती ही कशीही असली तरी मनात जर प्रचंड तीव्र अशी ईच्छा असेल ना तर पुन्हा नव्यानं सारं काही आकाराला येतं. दुष्काळानं भेगाळलेल्या जमिनीतही एक अंकूर डोकं वर काढतोना अगदी तसचं. त्या अंकुराला पाहताच आश्चर्य वाटू लागतं की इतक्या वृक्ष कोरड्या भेगाळलेल्या जमिनी कुठून शक्ती मिळाली असेल या बीजाला अंकुरायला. कदाचित बीजाची आत्मविश्वासाची ताकतच साऱ्या परिस्थितीवर मात करायला शिकवत असेल असच वाटतं. डोंगराला भेदुनही असचं एखादं रोप वर येत ना तेव्हा ही. एकूण काय मनात मायेचा ओलावा अन इच्छेच बीज जर असेलना तर त्या अंकुरणाऱ्या बीजासारखच जगणही अंकुरीत होईल, नव्या आशेसह.

असता इच्छा दुर्दम्य
मार्ग निघती अगम्य
सुकली भुमी टनक खडक
तरी रोप उगवेच कडक

वरवर दिसते रोप मृदू
इच्छा त्याची खडक खणू
पाणी कोठून आणायचे
उद्या कसे मी जगायचे

रडणे नाही नाही कुथणे
चिंतेमध्ये उगा न डुबणे
ह्या क्षणाला परिस्थितीला
नमवून डोके वर काढणे

बीज केवढे केव्हडा जीव
नको तरी पण कोणची कीव
हिंमत अंगची जागवावची
धरीत्रीला ही फाकवायची

कोंबासाठी ती नरमेल
वृक्ष ढेकळे दूर करेल
असेच सहजी कशी करेल
आतून धक्का द्यावा लागेल

चिडेल, ओरडेल, वैतागेल
कोंबासाठी पण सार ऐकेल
थोड थोड टनक पण
दूर सारून त्याला पोसेल

आत खोल खोल कना कनांत
ओलावा जपलेला मनामनांत
बीज देऊन अंकुरेल
रोप स्नेहाने तरतरेल

डोंगर फाडून असेच येणे
पाझर दगडा फोडून जाणे
कुठले पाणी कसे साचले
मन त्याचेही असते ओले

बसं... ओलावा तो छुपलेला
जगापासूनी लपलेला
आपुलकीचे बीज अंकुरण्या
वसा मायेचा वसलेला

वसा मायेचा वसलेला

# (२६)
# मोती शिंपल्यातला

निसर्गाचे चमत्कार म्हणा वा अतुल्य कलाकृती म्हणा. स्वाती या नक्षत्रावर पावसाचा थेंब शिंपल्यात जातो, तो माती रुपात चमकून उठतो. शिंपल्यात जन्मलेला हा मोती आपलं भाग्य घेऊन येत असेल नाही. शिंपले त्याला किती जपून आकार आणत असतील. रत्नाचाही आपापला असा एक स्वभाव असतो. तो जन्मजातच असेल जसा माणसांचा या रत्नाचा मालकही ज्योतीष शास्त्रानुसार तो मोहक चंद्रमा आहाहा ती चंद्राची आल्हाद कथा या रत्नानही घेतली अन आपल्या हाती जणू चंद्राच बींबच आलं. ते दागीण्यात गेलं परंपरेत मिसळलं, लावण्यवतींनी मिरवलं मनही या मोत्यात क्षणांत जणू हरवलं. क्षणांचे हे मोती आपल्या मनात असतीलच ना कितीतरी सजलेले, प्रेमाणे भिजलेले हे क्षणांचे मोहक मोहक मोती.

मोती शिंपल्यातला
चकाकून उठला
एक थेंब वर्षेचा
स्वाती वरती दडला

नक्षत्री त्या जन्म चांगला
पाण्यालाही मोती लाभला
शिंपले झाले माता पिता
दोघे मिळूनी जपती त्याला

शिंपले पात्या अभीन्न होऊन
जलथेंबाला जपती स्वत:हून
बंद करून घेती दरवाजे
आत रत्न अनमोल निपजे



मोती सागरी जन्मा येतो
तरी विनम्र कायम राहतो
रत्नकराच्या भांडारातून
शांत स्वभावे परिचीत होतो

चद्रासम उज्वल कांती
परीधानाने लाभते शांती
जंद्राचे हे रत्न राजस
मौक्तिक माला दिसती मोहक

परंपरेणे मोत्या जपले
दागदागिने सुंदर घडले
मुकूटापासून पैंजन जोडवी
नथीमध्ये तर कलाकुसर घडली

मनात मोती क्षणाक्षणांचे
आनंदाचे मौक्तिक हार
असतील जपले प्रत्येकाने
होत शिंपले वारंवार

# (२७)
## स्वप्न डोंगराचे

ओसाड बोडखा डोंगर निराश बसलेला असेल का? नुसत्या कातार्ळ पाषानांनी तो उदास झालेला असेल का? कधी येईल वर्षाराणी भिजवून चिंब करेल त्याला. पाषाणाच्या हृदयाला ही पाझर झरझर फुटेल तेव्हा. दडलेल्या बीजांमधून डोंगरावर हिरवाईचे कोंब डोकावतील ते ही अधाशासारखे सर सर मोठे होतील. उदास डोंगराची उदासी केव्हाच पळून जाईल. हिरवा हिरवा झगा तो अंगावर घालून सजेल. नदयाही खळखळत त्याचे कौतुक करतील. आकाश आपले प्रतिबींबच पाहील जणू त्यावर. डोंगर मनाने राधा होईल क्षणात. प्रेमाचे गुज आकाशाच्या कानात. शामरंगी आकाश श्याम होताना डोंगराई ही राधा होऊन लाजताना. निसर्गातले असे क्षण टीपून घेऊन श्रीमंत होता येईल. फक्त मन मात्र सदैव सौंदर्य ग्राहक असच ठेवायला हवं. बस.

हे डोंगर की पाचूच सुंदर
लेणे हिरवे हिरवे गार
खंडर होते इथे एकदा
कुणी कधी सांगू शकणार

हिरव्या हिरव्या गाल मलमली
शेल्याने डोंगर झाकली
शृंगाराला उधान आले
आभाळाने कात टाकली

कातळ ऊंच खडक पोसले
दरी दरीतून निराश बसले
उदास साऱ्या परिसराला
वर्षावाचे स्वप्नच दिसले

धुक्यात वेड्या फिके जाहले
ऊन जरासे दपकत आले
डोंगर हिरवे मुकूट घालूनी
मोरपिसांनी सजुन गेले

डोंगर स्वप्नी भिजून गेला
कडे कपाऱ्या चिंब जाहल्या
दऱ्या दऱ्यातून श्रोत वाहिले
क्षणात खळखळ नद्या वाहिल्या

सजून धजून निळा शाम होऊनी
स्वर्गाचे सुर ओठी घेऊनी
नभकृष्णा ये झुकता खाली
डोंगर राधा बहरून आली

हिरवे डोंगर सजली धरती
आकाशाची निळाई वरती
हरित दर्पनी रुप पाहता
डोंगर हिरवा निळ्याला भरती



## (२८)

## पावसाचं लग्न

पावसाळ्यात घर, अंगण, मन सारं सारं चिंब होतं. पत्र्याच्या छतावरुन एका समान रांगेत खाली कोसळणाऱ्या या नाजूक धारा सुंदरसा पडदाच निर्माण करतात. या पडद्या आडून घर अंगणाला तर अंगण घराला स्वच्छ नितळ होताना पाहतं. हा धारांचा पडदा काय निमुटपणे पत्र्यावरून खाली कोसळत असेल का बरं. छे छे घराला हा कसा पाहत असेल, माणसा सारख्याच हळूवार भावना यांच्यावर आरोपीत झाल्या तर. पडत्या पावसात तिथ लगीन घाईच झाली तर. कसा असेल हा सोहळा? नवरा कोण नवरी कोण? वऱ्हाडी कोण कोण? मुलीची आई कोण? ती काय विनवेल विहीन गाऊन? हा संसार बहरावा म्हणून सृष्टी कशी बर अक्षता टाकेल? हं पावसाच लग्नच पाहावं लागेल.

माझ्या पत्र्याच्या छतावरून
धारा पावसाच्या कोसळती
जल पडदा सळसळतो
विटा उनाच्या ढासळती

घर अंगणाला पाहत
स्वच्छ न्हाहत धूत होत
धूळ साचलेले मळकट
पाऱ्यावानी चित्र होत

पडदा पाण्याचा हालतो
वारा वारा धारेशी खेळतो
अंग चोरट्या लाजेनं
बुजऱ्या प्रियेला पाहतो

पडदा अवखळ राजस
हळू आत डोकावतो
रुप भिजल निरखाया
खट्याळ रोज सोकावतो

घर राजसी ला माहीत
त्याच चोरून पाहण
नजरेत तिला भरुनी
दृष्टी सुखान वाहण

छतावरच्या भांगातून
काळ्या भुऱ्या कुंतलातून
प्रितधारेचा शेंदुर
टप टप मंत्रांचा उच्चार

ढोल ढगांचा वाजतो
नवरा पावसाचा सजतो
वाट पाहून थकलेल्या
सदन नवरीला निजवतो

झांड वेली फुलं पानं
आले वऱ्हाडी सजून
विजबाई चमकुन
घेते सुन्मूख पाहून

पावसाचा लगीन सोहळा
देव ढगातून गोळा
धारा फुलांचा वर्षाव
गळा गंध सुत्र घाला

धरती नटून हिरवाई न
शालू पाचूचा लेउन
विहीन पंगत वाढली
फुलं रांगोळी काढली

धरणी विहीन गाऊन
लळा लावण्या विनवून
सांगे पाऊस जावया
प्रेम द्या हो बरसून

तुमचा वियोग न व्हावा
सुखानं करावा संसार
धान्य लक्ष्मी भरल्या
अर्धांगिनीला आधार

# (२९)
## वेडा पाऊस

पाऊस, पाऊस, पाऊस म्हटलं की किती छान तरल भावना जाग्या होतात नाही मनात. माणसाच अन पावसाच काहीतरी वेगळच नात असतं. पावसाच्या मनातही कुण्या पृथ्वीवरील सखीबाबत ओलावा असेल तर. पण त्याच कधी तरी उनाड रागानं बरसणं तिच सारं काही घेऊन गेल असेल तर अन त्याला त्याची कल्पनाही नसेल तर तो तिच्यासाठी पुन्हा काही वर्षांनी छान सैयावान बरसतोय शहान्यासारखा. पण ते तेव्हाच रागीट वेडेपण तीच्या मनावर जखमा करुन गेलय कायमच्याच. आता ती भिजतही नाही त्याच्या मध्ये स्वत:ला झोकतही नाही. डोळ्यादेखत आईचा संसार वाहून गेलेला तीनं पाहीलाय. अन स्वत:चा संसार ती या पावसाबरं कसा मांडेल आता. तीची जननी गेली. या वेड्या पावसानचं हिरावली. आता तिच्या मनात पावसाशी खट्याळ गोष्टी करण्याचे विचारही जन्माला येत नाहीत. ती पावसासाठी पारखी झालीये तो आता कितीही शहाण्यासारखा वागला ना तरीही. तिच्यासाठी तो कितीही झुरला ना तरीही. डोळे वाहून सरसर सरसर रडत राहीलाना तरीही.

आज पुन्हा वेडा झाला पाऊस
तु भेटलीच न्हाईस
का असा कोसळतोय
आतून सारा ढासळतोय
खबरभात तू काही
घेतलीच न्हाईस

किती वागला शहाण्या सारखा
शांत रिमझीमला
हवा तेव्हाच हवा तितकाच
संयमानं गुणगुणला

तिने दखल घेतलीच नाही
खिडकीतून सुद्धा वाकलीच नाही
छत्र घेऊन का होईना
एकदा बाहेर यायचं होतस गं
दोन चार थेंबांना अंगावर
झेलुन घ्यायचं होतस गं

ठरवलच तिनं भिजायच
नाही म्हणजे नाही
काहीही झालं तरी
उनाड वागायच नाही

दूरूनचं पाहील तर पहायच
त्याच आभाळ भरून येण
झाकाळून आसमंत
जरा उदासच करून जाण

त्याला काय माहीत
कोळण्याशिवाय
मागे एकदा धुडगुस घातला
घरादारात घुसून बसला
राग इतका अनावर त्याचा
जाताना पुर होऊन बसला

रोजची ओळखीची गुणी नदी
दुथडी भरून वाहू लागली
याचा जोर सरतच नव्हता
पाण्यान परिसर भरतच होता

हा वेड्यासारखा बरसून गेला
आईचा संसार वाहून गेला
नुसता संसार, भांडी, कुंडी,
चीज, वस्तू गेल्याही असत्या
माणसं एक होऊन पुन्हा साऱ्या
मिळवल्याही असत्या

आई गेली रे ती गेली
तुझ्या बेभान बरसण्यात
आभाळ फाटल बघ
तेव्हा एका क्षणात

ती ही बरसायची
प्रमानं अविरत माझ्यावर
दुधाला पुर यायचा रे
पदरा खाली मला सांभाळत

तिच्या पुरानं जिवदान दिलं
अंगात बळाच इमान आल
अन तू असा आलास
हैवान झालास
थैमान घालून तिलाच
जगातून घेऊन गेलास

मगं पुलाखालून पाणी गेल
मायेच भरत वाहीलं
उर फुटुन त्या दिवशी
तुझ्यापेक्षा मी जास्त बरसले
काकुळतीच्या स्वराने
आईसाठी तरसले

आता ती नाहीये
घराला घरपण नाहीये
आता कुठून भिजायचे रे
तिच्या आठवांनी
भरलेल्या डोळ्यांना
तिच्याच विनलेल्या
गोधडीत दडवायचं

म्हणूनच आता पाऊस
मला नाही आवडत
संथ बरसलेला ही
अन वेड्यागत कोसळलेला ही

# (३०)
## दुतर्फा झाडांची दाटी

जीवनाचा प्रवासही अगम्य आहे. सहज कधीतरी कुठेतरी आपण मनाला वीरंगुळा म्हणून भटकायला जावं, कल्पनाही केली नसेल इतका सुंदर निसर्ग हात पुढे करुन स्वागताला तयार असावा. त्याच्या तो पाहूनचार त्याच नितळ सौंदर्य, ती आल्हाकदा, तो विश्वास, ती आश्वासकता, तो मोकळा श्वास, ते रमनियत्व, ते ताजपण, ते तवानपन, ती निवांतता, ती एकांतता, ते मधूर गुंजन, ते संथपने नदीच वाहणं, ते सुंदरस तळ, तळ्यातल स्वच्छ प्रतिबींब, छानसा रस्ता जो या सुंदरतेतून हळू हळू शांतपणे पुढे जातोय. हे सगळं पाहिलं की सारं सारं सोडून तिथे रेंगाळावं वाटत ना. ज्या घराची आपल्याला प्रचंड ओढ असते ते सारं सारं विसरुन या निसर्गाच्या घरात निवांत थोडावेळ राहावसं वाटतं ना. इतकच काय तर परतही जावसं वाटत नाही. मन निसर्गच होतं. नव्या सर्गाच्या सृजनात ते रमुनही जातं.



दुतर्फा झाडांची दाटी
रस्ता रमनी ही शेलाटी
पलीकडे नितळ तळी शांत
परिसर रम्य एकांत

वाटते इथेच थांबावे
क्षण थोडे जगून हे घ्यावे
प्रतिबिंब तळ्यातील स्वच्छ
हे चित्र मनी रेखावे

रस्त्याच्या कडेला रांगोळी
लुसलूस नरम गवताची
ताचेतवाने होऊन गावे
त्याला संगती घेऊन जावे

ही पृथ्वी अशीच रहावी
हिरवाई सजून जावी
थकलेल्या या जिवांना
दृष्टी चैतन्याची मिळावी

सृष्टी ठरते प्रभावी
मुठ माती दु:ख द्यावी
जन्मून नव्याने येथे
नवनवी सुरुवात व्हावी

श्वासात ताजेपण घ्यावे
आपणही निसर्ग व्हावे
क्षण भर चित्रासम येथे
स्थिर शांत निवांत रहावे

# (३१)
## वसा कोणता पुण्याचा

थंडीचे दिवस, सकाळी सकाळी शेताकडे निघालेला शेतकरी राजा. धुक पसरुन सारं गाव निराळचं दिसनारं. थंडीन पांझरुनात मस्त गरम झोपणारं. घरदारं, रस्ते, शेतं सगळीच धुक्यात गुडूप झालेली. उन सुद्धा कुठूनतरी वाट काढत पोचणारी. हा मात्र निघालाय शेतावर राबायला. घरातून आजतरी त्यानं जाऊ नये असच वाटतय त्याच्या कारभारणीला तीच हे स्वप्न आज जरा निवांतपणे गुलाबी झालयं ना. त्याच्यासोबत थोड रमण्यासाठी मन अधीर झालयनां त्याच्या मनात मात्र शेतावरची कामं. कणीस येतय आकारा अन दिसत्यात टपोरं दानं. त्याला शेतावरची लगबग. तिच मन उगाच घुटमळतय त्याच्या मग. तरी सोडलं त्याने सगळं. पहाटेलाच निघालाय धुक्यातली वाट तुडवत. शेतासाठी, लोकांसाठी, लोकांच्या पोटासाठी, पोटातल्या आगीसाठी, भुकेच्या धगीसाठी काय म्हणावं या शेतकरी राजाला. केव्हड हे ऋण त्याच. ते ऋण कधीही न फेडता येणारं.

झुंजूमुंजू राणामंदी
आज धुक्याची पहाट
वाटेमंदी निसर्गाचा
थंडी भरलेला थाट

घर धनी माझा रोज
पहाटला निघ राने
कधी निजावं की त्यानी
सुख माझ पांघरुनी

घर पांघरुन उभी
धूक भरली चादर
सारे घरात गुडूप
नाही कोणाचा वावर

दाना दाना पिकवीता
उन वारा पाऊसही
शिरशीरल्या थंडीत
घाम वाहे अंगातून

सूर्व्या थोडा झाकलेला
ऊन्ह गाळून ये त्यात
सोनं सोनेरी किरण
थंड चंदेरी हो त्यात

सुख कशातगं माझ
ऐक सागे तुझा स्वामी
मिळो भाकर जेवाया
राहो उपाशी ना कोणी

झाडं झाडं शहारली
पानं पानं मोहरली
बैलगाडी तशातून
घुंगुरान हंबरली

घर सोडावं वाटना
थंडी गुलाबी दाटली
जरा थांबा की हो आज
कारभारीण हटूटली

ऋतू असुदे कोणता
धनी राहू दे राबता
अन्न पिकविन्या विना
वसा कोणता पुण्याचा

# (३२)
## माझं झोपडं सुरेख

प्रत्येकाचच घराच एक स्वप्न असतं. मग ते घर झोपडी असो की महाल. ते सजवण्यासाठी प्रत्येकाची धडपड असते. कृतीम रित्या घर सजवण हे नेहमीच चालतं. पण निसर्ग सौंदर्यान आपलं घर जर स्वता:हून सजवल तर इतर कोणती सजावट त्याची बरोबरी करु शकेल बरं. झाडं, वेली, संथ वाहणारी नदी, पक्ष्यायांची कीलबील, गवताचा पायी गालीचा, धरणी हिरवीगार, पिकलेली शेती अशा सभोवताल मध्ये शांत शांत पाण्यात हळूच होडी सोडून आपण त्यात बसुन हे सारं सारं निरखावं. वाह वाह वाह, काय सुंदर चित्र आहे नाही हे, अस घर अन अशा निसर्गाच्या कुशीतल्या घरट्यात, झोपड्यात राहणारे मग तर अजूनच भाग्यशाली. ते अधीकच सुदैवी.



रानं हिरवाई मंदी
माझ झोपडं सुरेख
पुढं नदी वाहताना
प्रतिबिंबाला तू देख

झाडं डेरेदार उभी
देण्या सावली गडद
दुरांमधी पक्षी गाती
ऐक किलबील नाद

गवतानं अंथरला
पायी गालीचा हिरवा
सुखस्पर्श त्याचा होता
मऊ लागतो गारवा

अंगावर धरनीच्या
भर जरी शालू आला
हिरव्या कंच मऊशार
धाग्या धाग्यानं विनला

सोनसळी ऊन येता
हिरवळ चमकते
भुई अंतरले तन
तरारुन दमकते

शेत पिकल्या रेघात
सरळपण ते ओघात
वाट वाकडी कशाला
निसर्ग नि माणसात

शांत निवांत पाण्यात
होडी ढकलावी आत
सृष्टी संग विनूयार्की
घरटं सुगरणी नात

## (३३)
# काळं निळं आभाळ

वर्षा ऋतू त्यातला सर सर सरींनी बरसणारा हा पाऊस सगळ्यांनाच आवडतो. तो वेडही लावतो. पण सुंदर पावसाचा आनंद अलीकडे फारसा पाहायलाच मिळत नाही. चुकतोय का काही निसर्ग. छे छे, आपणचं तर चुकतोय. ढवळाढवळ करतोय आपण त्याच्या राज्यात त्याच्या साम्राज्यात आपण आपले नियम घुसडतोय. त्याचे त्याचे कायदे नियम तो उत्तमपणे चालवत असतो. आपण मात्र खूप शहाने झालो या आर्विभावात निसर्गावर मात करतोय. त्यालाच त्याच्या शक्तीलाच आव्हान देतोय. कसा बरसेल मग तो तरी मर्यादेत. त्याचीही नियत फिरणारच की. इतका त्रासून, वैतागुन, चिडून तो मुसळाच्या धारांनी झोडपून काढतो की वाताहत होते अगदी मोजक्या क्षणात हवाहवासा पाऊस होत्याचं नव्हत करतो. तो वाईट नाहीचय, आपण चुकलोय असा पाऊस नकोच. चला स्वतःला या नुकसानीतून बाहेर काढू. निसर्गावर मात करण्याच्या स्वभावातून आपण बाहेर पडू.

काळ्या निळ्या आभाळाची
आज नियत नाही दिसत चांगली
धरेला धरलय धारेवर
जीव लागलेत टांगनी

धारा मुसळाच्या फेकतोय
गारा टपोऱ्या मारतोय
गडगडाट कर्कश करूनी
विजेचं चाबूक ओढतोय

आज गड्याची दिसतेय
मर्जी खपा
वाराही वाहतोय
सुसाट असा

ढग उरलेत धरनीवर
योद्धा सैनिक ऐरणीवर
आभाळ फुटलय तुफान सुटलय
जोराच पाणी पृथ्वीवर

आवरू कस सावरू कस
रडून पाणी वाढवू कस
वाहीलं रे वाहीलं रे वाहीलं सारं
जलमय जलमय झालं बरं

येवढा राग पाहिलाय आज
ढगापुढे ना कोणाजा आवाज
संकट असलं आणलय की
निसर्ग कोपा मानलय की

माणसा माणसा शहाना हो
थांबव ऱ्हास चाललाय जो
निसर्ग मैतर होशील जर
सुखात झेलून घेशील ना सर

# (३४)
# झुडूप काटेरी

कधी कधी नशीब अनाकलनीय अस काहीतरी बहाल करुन जात असतं. माणसाला तसच इतर सजीवांना ही सारी सारी पानं गळून केवळ काटेच शिल्लक राहीलेल्या काट्या कुट्या फांद्यांवर काटेरी दुःख विसावतानाच कुठूनतरी दवाची सकाळ धुक्यातून येते अन काट्यांलाही मोत्यांची माळ वितरीत करते. मग काय पुनः रात्री काय दिवसाच सजून बसते. साऱ्या साऱ्या चांदण्या या काटेरी झुडूपावर चकाकून जातात. कोणाच्या तरी गालावर खळीही सजते आपापले बोचरे स्वभाव सोडून काटेही गोड वाटू लागतात. सारेच कसे सुंदरतेचे हास्य घेऊन फूलांसारखे कोमल वागू लागतात.

झुडूप काटेरी
आज आज दिसतय चंदेरी
काय किमया झालीया
दिस पुनव ल्यालीया

आभायातल्या चांदण्या
जरा फिराया आल्यात
पावसाच्या सरीसंग
चांदण्यात नहाल्यात

गोऱ्या गोऱ्या गालावर
खळी दवाची पडलीया
साडी काट्यात रुतून
सोडविन्यास अडलीया

काटा शहारुन आलाय
हिव अंगामधी भरलाय
दवराणीच्या संगतीनं
काटा बोचायचं भुललाय

सर सर सर बरसुन
उगा निवांत बसलीया
एका काटेरी झाडावर
रत्न माळ ही कसलीया

## (३५)
## संथ वाहताना

सततच्या धकाधकीच्या, दगदगीच्या, धावपळीच्या, गजबटाच्या, गोंगाटाच्या, कोलाहलाच्या जीवनात खरा शोध कशाचा घेत असतो आपण तर शांततेचा. शांतता मनाला आणखी उभारी देते. सततच्या अशांततेने थकलेल्या अंत:करणाला ती विश्रांती देते. सर्वात जास्त कार्यरत असतं ते हे आपलं मन त्याला क्षणाचीही उसंत नसते. विचारात सदैव गर्क असलेलं हे मन अथकपणे काय करत राहतं. त्याची काळजी किती जण घेतात बरं? त्याची काळजी घेणं म्हणजे त्याला वेगळ्या ठिकाणी, निसर्गरम्य ठिकणी नेऊन चार क्षण शांततेचे देणे केव्हडा आराम पडतो या मनाला. सतत वाहणाऱ्या या नदीच तरी मनापेक्षा काय वेगळयं बरं. कुठल्यातरी वळनावर तिलाही संथ वाहत शांत भाव स्विकारावा वाटला तर. तिलाही ही शांतता निवांतता देईल, अशा तिला पाहून आपण मनही शांत, निवांत, निश्रांत होईल.

संथ वाहताना मला
लाभतो शांत भाव
किती लहरी उठती
जळ चंचळ स्वभाव

तरी लाभते वळण
एका वळण वाटेला
लहरींचा जोर कमी
शांत झोडपे तिराला

शांत स्वच्छ माझ्या जळी
प्रतिबींब सारे शांत
झाडे झुडूपे मौनात
परिसर हा निवांत

कधी बोलण्या स्वत:शी
अशी शांतता हवीसी
आत डोकावून पाहू
शोधू स्वतःला नवीशी

# (३६)
# पर्ण सुंदऱ्या

निसर्गाचं देण अपरिमीत असतं. झाडं, वेली, पानं, फुलं, पक्षी, पशु सारं सारं किती वेगवेगळं अन सुंदर निर्मान केलय त्यानं. नुसत्या पानंच किती आकार किती प्रकार किती वेगवेगळे स्पर्श त्यांचे. रंग त र खुमासदार, वेगवेगळे डौलदार रंग असे की बहारदार नुसत्या पानंच्या रंगावर बोलायचे तर रंगायतन होईल मोठे. सृष्टीचे हे रंगीत सोहळेच की अजून वेगळे रंग सोहळे ते कोणते असणार. झाडांचे अन पानांचे नाते राधा दामोदरासारखेच असले तर, तसे भासले तर. निसर्ग कृष्ण अन राधा कवी मनाच्या कल्पनेनच बघा.

रंग सावळा जरठ पानांचा
नवी पालवी हरीत कोवळी
कुठे लालसर कुठे श्वेतसर
कुठे गुलाबी पानशराबी
केशर अंगी पोपट रंगी
अबोली डोले रंग खुमार
रंग रंगल पर्ण कोवळे
रम्य सृष्टीचे रंग सोहळे
झाड दामोदर राधा पाने
नसा नसा तून कृष्ण वाहणे
प्रत्येकीचा रंग आगळा
राधा रंगीत कृष्ण सावळा
रास रंगाचा तो आधार
रंगे गोपीका अपरंपार
खुले गोपीका तशी राधीका
प्रत्येकीला शाम भेटतो
रंगुन गेल्या गुंगून गेल्या
श्रीरंगच्या मनी सावल्या
रास क्रिडेची अशी मोहिनी
निसर्ग मोहन राधा योगीनी

# (३७)
## येता पावसाची सर

ऋतू येतात, ऋतू जातात. सामान्यांना त्यांचा आनंद सहजच लूटता येतो. शेतकऱ्याला मात्र एका ऋतूची चातकासारखी आस लागलेली असते. तो म्हणजे पावसाळा. मृगाच नक्षत्र, पहिला पाऊस, शेतातली पेरणी, पुढच सारं चित्र त्याच्या मनात सतत उमटत राहतं. शेतातली पेरणी म्हणजे घरातली जणू लगीनघाईच. आधी सगळी तयारी करून जमीन नांगरुन भुसभुशीत करून कधी एकदा सर येते तीला ओली करते अन मग तीच्या कुशीतून पीक तरारून येतं असचं त्याला वाटत राहतं. त्याची तहान भुक विसरुन तो सर आल्यानंतर धावत जातो शेतात. तीथं बीज रोवत जातो तो. तीथच त्याची संगीताची मैफील ही सजते. तीथच त्याची देवपुजा ही घडते. घर लक्ष्मी ही हसु लागते. एक सर केव्हड सार करून जाते. मनातल्या शेतात पिकांना डोलवून जाते.

येता पावसाची सर
चिंता सरते की दूर
माझा बळीराजा धाव
शेतामंदी भर भर

बळीराजा गं खुशीत
खुशहाली त्यो पुशीत
बाप आभाळाचं रीन
बीज धरणी कुशीत

शेत नांगरुन झालं
आता पेरायचं बीज
सर्जा राजा गणप्या हणप्या
लगबगीनं निघालं

नांगरल्या शिवारात
कुटं चालली पेरणी
बीज बीज रुप होई
माझं मन हो धरणी

न्याहारीची सय नाही
शिवारात लगीन घाई
आज धरती नाहती धूती
गंध लेऊन सजली माती

बीज मातीखाली जात
सारं सपान फुलतं
बीज अंकुरण्या आधी
मन पिकाशी डोलतं

बैल जोड्या राबत्याती
माझी पोरचं ती हायती
साथ त्यांची या जीवाला
कशी जिवापाड नाती

दिन रात माझ्यासंग
राबतोया श्रीरंग
नंदी शिवाचा बी दंग
कष्ट सुरात सारंग

त्याच्या कष्टाची बासुरी
आली घेऊनी या सरी
राग सरींचा मल्हार
त्यात लपली बागेश्री

हिरवा शालु भरजरी
तिच्या रुपा तरतरी
आता सर्गाची ही तोड
शेत लक्ष्मी श्रीहरी

तिची किरपा घरी दारी
पसा पसा धान्य भरी
कनग्या भरून पावला
सुपात मोती आल्या

जात्याच चाक फिरलं
ओवीनं सुरा धरलं
पीठं परातीत मळता
दैन्य भुकेच सरलं

चुलं आज तेजाळली
भाकर तव्यावर आली
माझ्या कारभारणीची
खुशी फुलूनीया गेली

घरादाराच्या ताटात
घास मोतीयाचा आला
थेंब घामाचे गळता
चंदनाचा वास आला

अशी देवाजीची किरपा
साऱ्या माणसांवर रहावी
मिळो कष्टाची भाकरी
इडा पिडा दूर व्हावी

# (३८)
# हिरव्या हिरव्या गवत पात्या

मराठी बारा महिण्यांचा बारा प्रमारचा रुप सोहळा असतो. त्यात श्रावणाला राजात म्हणता येईल. सारी सृष्टी पावसाच्या सरींनी चिंब झालेली असते. शेतात पीकांनी पुष्टता धरलेली दिसते. ओसाड, भकास, रानो माळही गवतांनी झाडवेलींनी सजून धजून गेलेले असतात. ग्रीश्माच्या चटक्यांनी अंगाची लाही लाही होऊन जळून वाळून मळून पडलेल्या गवत पात्यांनी नव्याने जन्मून बारसं धरलेलं असतं. रानातल्या फुलांचा उत्सव सुरू झालेला असतो. यांच्या मनातली गाणी सृष्टीच गाऊ लागलेली असते. झाडांवरती झुले, झुल्यांवर माणसं, माणसांच मन आभाळात उंच उंच गेलेलं असतं. तर ह्या गवत पात्यांच इवलुस हृदय सुद्धा हिरवाईन ताज तवानं झालेलं असतं.



हिरव्या हिरव्या
गवत पात्या
दव पडताच
खुलती लवलवत्या

डोकावती मधुनच
रानफुले वेडी
गवताच्या सोहळ्याला
रंग रंग जोडी

कुठून असावे गळा
वेल डोकं काढी
आपल्या त्या पानांनी
धरणीला साडी

गुन्या गोविंदाने
ऊगवती सारे
श्रावणात फुलूनीया
फेर धरतारे

गाणी आनंदाची तुम्ही
दिसभर गाता
माणसाला वेगळाच
झुला झुलवता

हिरवी हिरवाई
डोळ्यास नवलाई
जवळून जाता
ताजी ताजी परवाई

# (३९)
# आठवणींचा पिंपळ

निसर्गातली काही झाडं खूप आधारदायी वाटतात. पिंपळ त्यातलाच एक डेरेदार असा हा वृक्ष पालवीन भरून जातो, वाऱ्याशी खेळू लागतो. सळसळत्या पानांनी बोलू लागतो. तशाच आठवणीही येतात एकदम बहरुन एकाचवेळी कितीतरी जागी गलगलक्याने. पिंपळ पानांचे रंग जसे बदलणारे त्यांच्या वया नुसार आठवणींचे रंगही वयानुसार बदलत जाणारे. पानांवरच्या रेघा जणू भाकीताची धार. झाडांच आणि या पानांच नातचं मोठ बिंधास्त. आपलं अन स्मृतींच्या पानांच असावं असचं. पिंपळ आपल्या पानांना जपतो, पानाआड कधीकधी तो लपतो. आपनही आठवणींच्या आड लपवतोना स्वत:ला कधी ऋतू बहराचे तर कधी गळतीचे तरीही पिंपळ पानांना आठवण म्हणून जपून ठेवणारे कित्येक जण त्याला हिरवाच ठेवतात मनात. त्या पानांची जाळी राहते शिल्लक पण स्मृती मात्र साऱ्या या जाळीत कायमच्या बंदीस्त होतात. पुन्हा पुन्हा नव्या होत हिरवी गाणी गातात.

आठवणींचा पिंपळ
बहरुन येतो वेळी अवेळी
मोठा सा हा वृक्ष
लगडून ऊन सोन सळी

नाजूक पालविला
कोवळी शी धार
रेघांच भाकीत
स्मृती हिरव्या गार

रंग हिरवाच
कसा म्हणावा
लालसर केशरी पांढुरक्या
पोपटीशार गोष्टी कळाव्या

हिंदोळ्यावर सुखाच्या
वारा अलगद झुलवत ऱ्हाई
पिंपळ पान ही डुलत हलत
आनंदानं सळसळत जाई

गळण्याची भीती नाही
सुकण्याचे नाही भय
डौलानं झाडावर
विसवण्याची केव्हडी सोय

झाडं ही कुशीत घेऊन
अगनीत पानांना
जपुन ठेवत राहतच ना
हव्या हव्याश्या क्षणांना

ते बहराचे रंग
हळू हळू गडदताना
कळतय कुठं पिंपळपाना
अवघे काळीज निसटताना

भर्रर कन ऋतूंचे
चक्र वेडे संपून जाते
शिशीराची शिरशीरी
पर्ण अलंकार लयास नेते

डोळ्या देखत साऱ्या गोष्टी
आठवनींच्या पिंपळ कोष्टी
गळून पायाशी पडतात तेव्हा
जरठ पिवळा रंग होतो नकोसा

कोणीतरी पिंपळ पान
हळूवार घेऊन
हृदयाच्या ग्रंथी मध्ये
ठेवत पहा कित्ती जपून

ऋतू सरतात
पानं गळतात
आठवांची सरबत्ती
झाडास बोडखे करून ठेवतात

एक पान असत कोशात
धुंद आपल्याच मधहोशात
वरच आवरन सोडून जात
पण आठवणींच जाळ उरत

केव्हड सुंदर दिसतं हे
आठवांच जाळ कोरीव
पुन्हा पुन्हा मनास अडकवीत
खुना ठेवत जपून भरीव

हृदयाशी हीच जाळी
क्षणभर बीलगून जाते जेव्हा
साऱ्या साऱ्या आठवांचा
अवघा पिंपळ वृक्ष उभा

# (४०)
## झुंजुमुंजु पहाटंला

निसर्गाच खरं सांदर्य पहायला मिळतं ते खेडोपाडी. शहरात सकाळ होते दुपारी अन रात्र जागणारी. खेड्यात मात्र पाहटेची लगबग सुर्य उगवण्या आधी जागणार माणसं. झुंजुमुंजु प्रकाशात लख्ख दिसणारी नवीन सृष्टी सोनेरी किरणांची उधळण करीत सुर्याच राजेशाही येणं. त्याच्या प्रकाशात स्वच्छ जगणं, स्वच्छ वागणं. नव्या प्रेरणा नव्या आशा पल्लवीत होणं. अशातच घाईघाईन शेतात जाणं. छान छान बैलजोडीनं रानाची वाट तुडवत निघनं ती वाटही वाट पाहणारी. सृष्टी सारी नव्यान बोलणारी शेतात राबणं आणि तीथूनच धान्य लक्ष्मी गवसणं. किती छान हे जीवन अनुभवऱ्या जोगचं आहे.

झुंजुमुंजु पहाटंला
सुर्व्या डोंगराच्या आड
सोन उधळत येई
रोज नवीन आल्याड

झाडं येली तरारती
परकाशात नाहती धुती
उषा येताच दाराशी
आशा कोंबहून जाती

रामाच्या पारी जावं
शेतामंधी बीगीबीगी
ढवळ्या पवळ्याची जोडी
वाट खिल्लारी तुडवी

वाट रोजचीच परी
रोज नवी भासतीया
माझ्या स्वागताला ती
सजूनीया बसतीया

पाना फुलांशी बोलत
एक सकाळ होतीया
गवताची पाती बघा
कानी काही सांगतीया

दौडत शेता जातो
तीथ राब राबतोया
माझी लक्ष्मी शेताची
भरभरून देतीया

रोज धनवान होतो
म्या तर तेजाळून जातो
आरोग्याची लयलूट
पहाटला जी करतो



# (४१)
## शुभ्र श्वेत रंग

रंग, रंगांची दुनीया खुपच न्यारी. सुंदर सुरेख, लोभस, मोहक असे कितीतरी रंग सप्तरंगांच्या इंद्रधनुतून रंगांचे सुटलेले बाण, अनेक रंगांना मिसळून नानाविध छटा निर्माण करतात. या साऱ्या रंगांना सामावून घेणारा जो पांढरा रंग असतोना तो सर्वात असतो. जरीही ना दिसतो तो असतोच. याच्या मध्ये सर्व रंग सामावलेले असतात. या रंगाने जगणे सारे कमावलेले असते. शुद्ध सात्विक पावीत्र्याच्या भावनांनी हा भरुन गेलेला असतो आणि भारुनही. शांतीच प्रतीक होत स्मरणात राहणारा. या जगात किती तरी गोष्टी कितीतरी बाबी त्यांच्या पांढऱ्या शुभ्रते साठी प्रसिद्ध आहेत. निसर्गात सर्वत्र हा रंग भरून गेलाय. माणसाच्या हसण्यात हाच रंग हसलेलाय. गुणांमध्ये श्रेष्ठ गुणात हा रंगच बसलेलाय हा शुभ्र रंग दिसलाका वरवर न दिसलेला.

शुभ्र श्वेत रंग कसा
धवल धवल पांढरा
निर्मळ शिष्कलंकही
सत्व भाव चांगला

उगम साऱ्या रंगांचा
रंग छुपे अंतरा
एक रंग दृष्यमान
शांत असा पांढरा

शांतीचे प्रतीक खगी
शुभ्र श्वेत कबुतरी
संदेशास धवल घेत
उडत उंच अंबरी

अंबरात मेघ शुभ्र
कापसाचे पिंजले
त्यास देखता नयन
गीत मनी गुंजले

शुभ्र फुले वेली वरी
झाडे त्यात हासती
दंत कळ्या वृक्ष कसे
दाखवीत नाचती

फेसळत्या धबधब्यात
रंग तोच सांडतो
हिरवाईच्या नजाऱ्यात
मोद मनी मांडतो

गाय वासरू धवल
गोड रुप भासते
दुग्ध गंगा शुभ्र पणे
जगताशी पोसते

जळ निर्मळ खळखळते
शुभ्र दार वाहावीत
जीवनास स्वच्छ करी
श्वेत वर्णी नाहावीत

साहित्यशार शारदेचे हसू
श्वेतवर्णी वीलसते
हास्यरंग शुभ्र हाच
कवीविश्व मानते


वसनतीचे वाहन ही
हंस शुभ्र होत असे
ज्ञान ध्यान जगती या
कांती तेज लख्य से

त्रिगुणातील सत्वगुण
श्वेत रंग पांघरे
वृत्ती उजळून जाय
सात्विक मन मंदिरे

# (४२)
# प्रचंड लाटा हुंकारणाऱ्या

सगळं काही सुरळीत चालू असताना, अचानकच निसर्गान दुष्काळाचं दर्शन घडवलं तर क्षणात सार संपूण जातं. खरतर अचानक अस निसर्ग का करेल? माणूस म्हणून कुठेतरी आपण त्याच्यावर कुरघडी करतो आहोत. त्याला त्या नियत चक्र फिरवताना आपणच अडथळा ठरतो आहोत. मग काय कुठे इतक्या प्रचंड लाटा सुऽऽ सुऽऽ करत सारं काही गीळंकृत करण्यासाठी उठतात. खरच सगळं सोबत घेऊन मगच शांत बसतात. ह्या जलप्रलयाने नाकातोंडात पाणी जाऊन जीतके मरतो ना आपण त्यापेक्षा जास्त आपल्या निसर्गावर अधिकार गाजवण्याच्या हव्यासानेच मरतो आपण. या वीरुद्ध कोरडा दुष्काळही कुठं डोक वर काढतो. पाण्याचा थेंबही निसर्गाकडून मिळत नाही. गुरं ढोरं पशु पक्षी माणसही पाणी पाणी करुन जीव सोडतात. सुकलेले डोळेही पाण्यासाठी तरसुन जातात. कोरडे घसे कोरड्या जमीनीत कोरडे ठरतात. खूप भयान चित्र आहे हे. दोन्ही ओल्या व सुक्या दुष्काळाचं. वेळीच जागे झालो तर बदलेल हे चित्र नाहीतर आपणच बदलून वीलयाला जाणार हे निश्चित.

प्रचंड लाटा हुंकारणाऱ्या
विनाशतारा झंकारणाऱ्या
सारे सारे नेती विलया
घेऊन येती कवे प्रलया



कुठे जीव जलमय होई
कुठे कोरडी ठाक ही भुई
पाण्यासाठी जीव कोरडा
पोचेल का बघ शुश्क ओरडा

चातक वाट पाहत राही
जल थेंबाला मुखात घेई
किती माणसे चातक झाली
आ वासून बघ गगणी गेली

धारा यावी मेघ मायेने
पाणी मिळावे प्रेम भराने
नको अधिकचे महापुराचे
अथवा कोरडे दुष्काळाचे

सागर राहो सीमेमध्ये
सुखी किणारे सुखी जीवते
रुद्र भयानक अवताराचे
दर्शन नकोच समुंदराचे

सुख दुखा:चे प्रसंग येती
पारखण्याल्या नाती गोती
निसर्ग व्हावा खरा सोबती
मग जगऱ्याचे रंगसंगती

## (४३)
## जरी असलो मी काटेरी

जगण्यात आशावाद खूपच महत्वाचा असतो. निसर्गात पदोपदी हा सापडत जातो. अगदी डोंगरावर वृक्ष खडकातून उगवलेलं एखाद काटेरी झुडूप सुद्धा किती सुंदर जगत असत नाही. सुखात वाढत प्रचंड आशेने वाढत असतं नाही. त्याला काटे असतात तरी ते बोचत नाहीत, त्याला. त्या काट्यातला ओलावा त्या पाषानातला ओलावा शोधण्याची ग्रहण करण्याची कला त्या काटेरी झुडूपाला अवगत झालेली असते. भवतालच्या परिस्थितीवर नाराज होऊन रडत राहून वेळ वाया घालवण्या पेक्षा जे दोन चार सुखाचे पर्ण आपल्या वाट्याला आलेले असतात त्यात आनंद मानत निश्चिंत होत या झुडपासारख जगलो तर नक्कीच जगणं सार्थक होईल. खरच हो ते खूप सुंदर होईल.

जरी असलो मी काटेरी
थोडासा बघ पानेरी
झुडूप म्हणू दे कोणी किती
मजला नसते काही भिती

मी खुशीत असतो मस्त मौला
खडकात झुलतोय माझा झुला
पाणी नसले तरी पहाना
काटा माझा असतो ओला

ना पानांना काटे बोचती
ना काट्यांना दुःख बोचते
झुडूप देही दुःख गुडूप
उनच सावली होती गुपचूप

सुखच सुख मानले तर
खडका पोटी असे निर्झर
मत बनवता वरचे वर
टाका वेगळी एक नजर

शांत निवांत स्थळ निर्जन
ओसाड वाटे प्रत्सर कण
तरीही उगवतो मी नुतन
डोंगर कुशीत येते वन

सुख असे शोधायचे असते
काट्यासंगेच जगायचे असते
नशीबी आली जितकी हिरवळ
उजळ माथी मिरवायची असते

खडकाचा आधार घेऊनी
खोल जावे त्या अंतःकरणी
ओलावा बघ तीथे सापडे
झुडपाचेही गोड रुपडे

मी उगवता डोंगर हसतो
मजशी जवळ घेऊन बसतो
कष्ट उपसले किती सोसले
तो माझ्या पानांतून गवसतो

# (४४)
## पाठलाग सूर्याचा

माणसांच्या जीवनात जशी जीवनसाथी येतात, त्यांच्या सुरेख जोड्या ठरतात. ते परस्परांवर प्रेम करतात. परस्परांचा अनुनय करतात. तसच निसर्गातही काही जोड्या असतील का हो? हो तर निसर्गातही अशाच जोड्या निश्चितच असतात. केवळ ती नजर आपल्या कडे असायला हवी. त्या भावना समजण्याची भावनीकता आपल्यामध्ये असायला हवी. त्यांच्यासाठी इतकं तरल होण्याची क्षमता आपल्या मध्ये हवी. कवी मनाला जे भावलं ते रसीकांनाही मनापासून आवडून जातं. रोज सकाळी सूर्य उगवतो या घटनेला सूर्य कोणाचातरी पाठलाग करतोय ती त्याची साथीदार प्रेयसी आहे का? ती सकाळच तर त्याची साथीदार. ती उषाच हो ती उषाच. ती आली की वातावरण कस प्रसन्न होतं. वातावरण कसं भरुन नी भारून जातं. त्याला मात्र करमत नाही तिच्याशिवाय. क्षणभरही चैन पडत नाही तिच्याविना. बैचेन होत तिच्या मागोमाग येत राहतो तो. सूर्य उषे साठी झुरत राहतोना. काय सुरेख जोडपय हे.

झाडा येलींच्या हिरवाईत
सुर्व्या करतोय पाठलाग
त्याची उषा गेली कुठं
आला शोधायला लगोलग

झाली कवाच जागी पाखरं
करती भजन रामाच्या पारी
सुख घेऊन आलीया
उषा घरात अन दारी

व्हती पावसाची रात
भिजून गेलीया धरणी
तिला सुखविन्या आली
वर्षे संगत उषाराणी



उन्ह पांघरुण शेत
आज झालीत सोन्याची
कोकीळाला आली हुक्की
राग गारीती दाण्याची

रानंफुलांचा गंध रानी
जाई संग मोगरा अंगणी
भरला सुवास मनातुनी
उषा हित सूर्य मागुनी

देखणं जोडप पाहायचं
खुशीत साऱ्यांनी नहायचं
सकाळी सकाळी ताजतवानं
होऊन किरणा लेवायचं

# (४५)
# सुंदर मोहक धबधबा

काही ऋतू सुंदर अलंकार सोबत घेऊनच येतात. पृथ्वीला ते बहाल करीत तीला अजूनच खुलवीत जातात. पावसाळ्यात किती तरी जलधारांचे अलंकार ती लेऊन बसते. हिऱ्याचे दागीनेच वाटतात. शुभ्रधारा डोंगरांवरुन हसत खिदलत कोसळू लागतात. इरवी वर्षभर या जलधारांच्या सुकलेल्या खुणा तिथं वाट पाहत बसलेल्या असतात. पुन्हा जेव्हा तिथं हे दागीणे घातले जातात ना तेव्हा सडे झालेले गळे अलंकारांनी खुलून दिसू लागतात वसुंधरेचे बाळ गोपाळांचे सारेच लोक या नवनव्या लहान सहान धबधब्यांमध्ये खालच्या कुंडांमध्ये डुंबण्याचा आनंद घेतात. खळ खळ अवखळ सारे आवाज मनाचे ग्लाने संपवून टाकतात. मनही धबधबा होऊन कोसळू लागतं. वेडं, स्वतःला झोकून देऊन खुशीत काही गाऊ लागतं. वेडं.

कोंडी फूटूनी वाहू लागले
        जळ कोंडातून जळ निर्मळ
वनराईच्या मध्ये डोले
        खळखळ अहखळ डोह खोडकर
पाऊस वेडा होऊन वाहे
        झरे निर्झरे धबधबे बंड
हिरवाई ही कौतुक करते
        वर्षा काठी येता जीवन
बाळ गोपाळे मारिती उड्या
        जळात भरल्या संजीवनी
मनसोक्त डुंबती डोह खिदळती
        हसरी पाने फुले
त्यातून श्रावण सारा डुले



## (४६)
## नकोसा पाऊस

कोणतीही गोष्ट मर्यादित असली की ती हिताची ठरते. मग ते माणसाचं वागणं असो की निसर्गाचं. वर्षभर पाऊस यावा म्हणून डोळ्यात त्राण आणून वाट पाहणाऱ्यांना तो जावा तो जावा तो थांबावा म्हणून प्रार्थना कराव्या लागत असतील आणि तरीही तो वेड्यासारखाच कोसळत असेल, सगळं नष्ट करत असेल तर नद्यांनाही जोर येईल ना मग. सगळंच वाहून नेण्यासाठी आधार ठरलेले वृक्ष क्षणांत उन्मळून पडतील. ज्यांना पक्की घरं आहेत त्यांच ठिकयं हो निदान निवारा तरीय त्यांना. पण गरीबांचे बेहाल कळतील का कुणाला अशा बेभान पावसाला अंगावर झेलून झाडं वेलीही थकून जातील. सगळेच जण हात जोडून वरुणाची प्रार्थना करतील. हवाहवासा पाऊस नकोनकोसा होतो ना तेव्हा डोल्यातली पाऊसही नकोसा वाटतो. पाऊस यावा यावा म्हणून चातकासारखी वाट पाहणारे आता तो जावा, थांबावा म्हणून धावा करीत आहेत. तो मात्र झोडपून काढतोय रागीट सनकी माथेफिरु सारखा, जमेल तेव्हडा बरसुन घेतोय कशाची ही परवा न करता.

नद्या दुथडी भरून वाहू लागल्यात
संगती माणसं जणावरांना नेऊ लागल्यात
घरं दारं पाण्याखाली बुडलीयेत
नाले सुद्धा माणसांना नडलीयेत
विशाल वृक्ष म्हणून ज्यांचा आधार वाटायचा
तेच आज उन्मलून पडलीयेत
मुळा सकट पाण्याच्या जोरात
धरणं कोरडी ठाक होती
आभाळकडे बघत झुरणारी
आज पावसाळ्याच्या चारच झडीत
भरून बेहाल झालीत उतरणीवरच्या वाडीत
गरीबांचे हाल काय सांगावेत
झोपडी पाण्यात तरंगत असताना

लेकरं अंगाखांद्यावर घेऊन बखोटीला
गाठोड बांधून निवारा शोधतायेत
घर दारं असलेले सतत बातम्या एकत
हळहळ व्यक्त करतायेत
आपापले सगळे सुखरुप आहेतना
म्हणून प्रार्थनापुर्वक विचारपुस करतायेत
झाडं वेली दमुन गेल्यात
पावसाला झेलून झेलून
अगदी माना टाकल्यायत
त्राण गेल्यागत हलून हलून
रोजचं हातावर पोट असणारे
हवालदील झालेत बाबा
उपाशी तरी किती राहायचं
नुसतीच खाऊन घेत हवा
थांब बाबा वरुन राजा
काहीली काहीली झालीये
थोडी विश्रांती घे तु ही धरणी
पाणी पाणी झालीये
अश्रु तीचे बांध फोडतायत
जीव सोडतायत
उरलेले जीव मुठीत घेऊन
आभाळाकडच पाहतायत
प्रलय इतका आणू नको
अजून फुलू दे पृथ्वीला
पाहिजे तेव्हड कधीच दिलय
आता उसंत देना तिला
तू घरादारात नाकातोंडात
असा बळच शिरू नकोस
जगण्याला भयभीत
रुद्र तांडव करू नकोस
हात जोडतोय तुझ्यापुढं
आवर तुझ्या धारांना
इतक रागावून मारतं कारे
कुणी आपल्या लेकरांना
पाणी अगून वाढेल म्हणून
आश्रुही समंजस झालेत
आतल्या आत वाहून
ते सुकुनही गेलेत

# (४७)
## सोनसकाळ

निसर्गातही रोज रोज त्याच घटना घडत असतात. जश्या आपल्याही जीवनात तरीपण निसर्गातली तीच तीच बाब सुद्धा रोज वेगळी रोज नित्य नव्याने सुंदर वाटत राहते. रात्रीचा काळोख संपवून जेव्हा प्रकाशाकडे ताबा जाऊ लागतो तेव्हा सारी पृथ्वी ही काळवंडले पण सोडून उजळून निघू लागते. कोवळी उन्ह आंगावर घेत सृष्टी चैतन्याने डवरुन येते. ही उषा असच प्रेरक काही घेऊन येते. ती आपल्या बरोबर रोज नवी आशा आणते. मग काय सगळा आळस झटकून सगळे जण कामाला लागतात. एक नवी जाग येते झोपलेलं रान जाग होऊन पाहू लागतं. ही सकाळ आणणारा सूर्य कितीही दूर असलाना तरी मनाच्या आत अगदी आपल्या जवळचा आसतोच.

उन्ह पांघरुण रानं
पुन्हा नवकी झालया
सोन सकाळ आलीया
मन सोनेरी झालया

कवडसा आधी आला
आली उषा त्याच्या मागं
तीनं पाय घोळ झगा
नेसला की झगमग

रातीचा त्यो अंधार
झाला गुडूप कव्हाच
एक आशा संगतीनं
तीनं आणली मनात

झटकून आळसाला
रानं लागलं कामाला
वनचरे निघाले की
घास गोड शोधण्याला

पानं पानं जाग झालं
सळसळून डुललं
वेलीराण्या झाडासंग
संसारी फूल आलं

झोपलेलं रान होतं
किर्रर कीड्यांच्या सूरात
आता सुर्व्या बघून
पक्षी गायन भरात

एक चैतण्याची लाट
आली तनात मनात
दूरवर नारायण
तरी रोज अंतरात



# (४८)
## गवताची सुगी

प्रत्येकाची कधीतरी चांगली वेळ येतेच. उदासवानं बसुन काय होणारेय तो ओसाड माळ किती उदास असेल. तो ही आपल्या सारखाच खिन्न का असेल. त्याचीही छानशी वेळ येते. पाहावसही वाटतं नव्हत ज्याच्याकडं त्याच्यावरची नजर आता हटत नाही. सगळी कडे हिरवं हिरवं गार गवत. गवताची पायघडी डोंजरावर सर्वत्र पसरलेली. गवतही खुशीत त्याचीही सुगी येते. डोळ्यांना आनंद तर होतोच पण मनही हिरवगार होऊन जातं. ताज तवानं गवत बोचतका कधीकधी, सुकलेलं मात्र बोचत राहतं सदा सर्वतोपरी म्हणून माणसानही मनाला ताजतवानं ठेवावं सुकु देऊ नये कधी मग अशा गवतावरही फूलं येऊ लागतील. ओसाडष्या माळावर खेळ खेळू लागतील. हळूच फुलपाखरही येतील मग सुंदर साज देतील मग.

गवताचीही सुगी येते
वैभव त्याचे पसरुन जाते
हिरव्या रंगात नाहून माखून
गवत कसे मोहरुन जाते

डोळ्याला केव्हडे छान वाटते
मनातही हिरवळ दाट दाटते
फिटले जसे पांग जणू
ओसाड माळरान प्रसन्न भासते

मंद झुळूक येते कुठूनशी
इवले इवले गवत डुलती
पात्या त्याच्या मऊ शार
येताच यौवन बोथट धार

तेच सुकले की टोचत राहील
उगाच कितीवेळ बोचत राहील
नकोसे वाटेल फिरकणे
क्षणांनीही सरकणे

म्हणून गवतास जीवंत ठेव
हरीत ताजे तवाने ठेव
सुकु देऊ नको बोचु देऊ नको
जमीन बंजर होऊ देऊ नको

हळूच गवत फूल उमलून येईल
छोट्याश्या झुळकेत डुलून जाईल
फुलपाखरं येतील मग
गवत डवरुन जाईल मग

# (४९)
## डोंगरावरची जत्रा

पावसाळ्यात कुठे कुठे सुंदर हिरवाईची जत्रा भरलेली असते. माणसं कशी गावच्या जत्रेत जाऊन खुशीन मजा करुन येतात. तसाच निसर्गही अशाच त्याच्याच जत्रांमध्ये सामील होत असतो. अशीच एक जत्रा भरलीय डोंगरावर. झाडं, वेली, घरे, धबधबे, गवतपात्या सारेच आलेत या जत्रेत. कितीही कष्ट उपसले असतील आधी पण आता मात्र जत्रेत ते खुश झालेत. कुठे सुंदर माळा कुठे कुणी रमतय आपल्याच करत चाळा. डोंगर स्वच्छ झालाय हिरवा हिरवा झगा की पांढरा पांढरा धोतर सगा तो लेऊन आलाय. या जत्रेन त्या डोंगराचा थाट काही निराळाच झालाय या जत्रेची मजा हौशा, गौशा, नवश्यांनी घ्यायलाच हवी.

डोंगरावर भरलीया
झाडाझुडपांची जत्रा
झरे धबधबे वाहतायत
सातशे सतरा

गवताच्या पात्या, होऊन दंग
झग्याच्या दावत्यात, पोपटी रंग
वर धुक्यानं केली, एकच दाटी
उन साहीलय, एका ह्या क्षणासाठी

झाडांनी घातलीया
दवांची माळ
खाली शेतात चालतोय
नांगराचा फाळ

ढगांनी धुतला डोंगर सारा
पाचूच धोतर नेसवलं जरा
डोंगर माथ्याला धुक्याचा फेटा
राजबींड्या डोंगराला भेटा

मनबी हिरवं तनबी हिरवं
डोळ्यातलं सपान झालया बरवं

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २0२0 प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्‌भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्‌भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी

भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी–जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड–गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग–निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप–स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन – भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन – भाग २), प्रमिला (धरती–आकाश), लाघव वेळा (सकाळ–संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया – कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग–१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात – डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये ‘मंजु मंजिरी’ आणि ‘सर्ग निसर्ग’ नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(राधाकृष्ण) – श्रीरंग, कृष्णकांत, (वेळा) – तेव्हा, (मिश्र कविता) – गंधराणी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) – सहा सोहळे, नभ मोजताना, (पाऊस कविता) – श्रावणी, (गझल) – उल्का, (वाट) – जरा रेंगाळले, (फुले) – कामिनी, (रंग) – रंगतनु, (सर्वोत्कृष्ट कविता) – माझी कविता.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utmsource=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>53335052919 8id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम -<br>"सर्ग_निसर्ग" ऑडिओ<br>अल्बम - "मंजुमंजिरी" | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of<br>100th Episode of<br>Mann Ki Baat from<br>Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग - १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग -२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ८७
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : १६
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●